पुणे, किशोर–वर्ष ५३, अंक ३ रा, मार्च २०२४ (मासिक) – किंमत रु.७/– पृष्ठे–५२.
Pune, Kishor - Vol.53, Issue 3, March, 2024 ( Monthly ) - Rs. 7 /- Pages -52


# किशोर

मार्च २०२४



# नारी वंदन

गोविंद करमरकर



जळते ज्योत स्वतः अन् उजळती दिशा दाही
कथा 'ती' च्या कर्तृत्वाची, आहे अशीच काही!
        सावित्री हे नाम घेऊनी ज्योतिर्मय जी झाली
        पद दलितांच्या उद्धारास्तव वस्त्र सतीचे ल्याली
        स्त्री–शिक्षणाची मशाल घेऊन जी देते क्रांतीची ग्वाही
        कथा 'ती' च्या कर्तृत्वाची आहे अशीच काही!
'मुरलीधरा' ची बासरी बोले लसलसत्या वेदना
आनंदवनातून अमृत बरसे 'बाबां' ची 'साधना'
'विकासांतून 'प्रकाश' उसळे, वेदना–व्यथांच्या डोही
कथा 'ती' च्या कर्तृत्वाची आहे अशीच काही!
        सपकाळांची सिंधू झाली अनाथांची नाथ
        हैवानांच्या जगात दिधली माणुसकीला साथ
        काळोखाच्या निबिड काननी, चांदण–मायेची ग्वाही
        कथा 'ती' च्या कर्तृत्वाची, आहे अशीच काही!
कुठे तळपे राणी बंग अन् कुठे स्मिता कोल्हे
कुठे मेधा पाटकरांची कर्तृत्व–पताका डोले
तेजाच्या या शलाकांना फिकीर तमाची नाही
कथा 'ती' च्या कर्तृत्वाची आहे अशीच काही
        नारी ऐशा किती वर्णू मी, ज्यांच्या बनल्या कथा
        यथार्थ गौरव करण्या त्यांच्या, नव्या रुजवू प्रथा
        ही नवगौरींची नाना रूपे अवघे विश्व पाही
        आपणही नतमस्तक होऊन, देऊ सलामी शाही!

संपर्क : ८८०५९५९८२४



# किशोर

मार्च २०२४, वर्ष ५३ वे, अंक ३ रा, माघ-फाल्गुन, शके १९४५

**संपादक :**
कृष्णकुमार पाटील, संचालक
महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती
व अभ्यासक्रम संशोधन मंडळ, पुणे

**प्रकाशक :**
विवेक उत्तम गोसावी
नियंत्रक, महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक
निर्मिती मंडळ, प्रभादेवी, मुंबई

**निर्मिती अधिकारी :**
हेमंत बाबर

**अक्षरजुळणी :** किशोर विभाग

**कार्यकारी संपादक :**
किरण केंद्रे

**वितरण व्यवस्थापक :**
जालिंदर पाटील

**मुखपृष्ठ पेंटींग**
अन्वर हुसेन
संपर्क : ९८५०९६५३८३

**चित्रांकन :**
घनश्याम देशमुख, माईंडईट संवाद,
धनश्री केळकर, राजेंद्र गिरधारी, अजय विभुते,
गणेश ढवळे, विरेश पराडकर, योगिता धोटे,


## अंतरंग


- नारी वंदन — गोविंद करमरकर — ०२
- मारीआनाचे माही — मेघश्री दळवी — ०६
- चला चित्र रंगवूया — धनश्री केळकर — १०
- रंगसंगती — जितेंद्र कुवर — ११
- मोठेपणी तू कोण होणार — मुकुंद टाकसाळे — १२
- चिमणी पाखरं — गणेश भाकरे — १५
- संकल्प पाणी बचतीचा — विनायक ढवळे — १६
- घुबड — प्रा.सय्यद अल्लाउद्दीन — १९
- निरीक्षण — डॉ.पंडित विद्यासागर — २०
- भूगोल गीत — चारुता प्रभुदेसाई — २२
- लाई आणि अमबम सेपिकला जाऊन कसे मिळाले — क्रिस्टोफर सोमरविले, अनु.माधुरी दीक्षित — २३
- खरं माकड कोण? — डॉ.शिरीष भावे — २६
- निसर्गाची हाक — संगीता केंजळे — २८
- ट्रेन-टायगर्स आणि टायर-क्रॉक — मालविका देखणे — ३२
- रंगात रंगली रंगपंचमी — मीना खोंड — ३६
- कुतूहल — अमित डहाणे — ३८

**बालविभाग**
- भावी आधारस्तंभ — ४०
- उमलती प्रतिभा — ४२
- चित्रकथा — घनश्याम देशमुख — ४४
- फुलपाखरू — भारती सावंत — ४६

**ENGLISH SECTION**
- She... — Umashankar Devadhe — ४७
- Save the 'BLUE' — Prachi Mokashi — ४८
- Funny Puzzle — ५०



ऑनलाईन वर्गणीकरिता : www.kishor.ebalbharati.in

वार्षिक वर्गणीची रक्कम रु.८०/- मनिऑर्डर अथवा कोणत्याही राष्ट्रीयीकृत बँकेच्या पुणे शाखेवरील डिमांड ड्राफ्टद्वारे संचालक, महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक मंडळ, या नावाने खाली नमूद केलेल्या पत्रव्यवहाराच्या पत्त्यावर पाठवावी. धनादेश स्वीकारला जाणार नाही.



**पत्रव्यवहाराचा पत्ता: कार्यकारी संपादक, किशोर, महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ,**
सेनापती बापट मार्ग, पुणे- ४११००४ संपादकीय : ०२०- २५७१६१०७, वितरण व तक्रार : ०२०-२५७१६२४४
ई-मेल : executive_editor_kishor@ebalbharati.in

# प्रिय किशोर

नमस्ते किशोर,

मी काही वर्षांपासून किशोरचा वाचक राहिलो आहे. खूप सोप्या भाषेत परिभाषित झालेलं हे भाषा-संवादन छोट्यांच्या सहजीवनाकडे आपल्याला घेऊन जाते. लेख, कविता, कथा, भाषिक खेळ, चित्रं, संवाद या विविधी कॅनव्हाससह हे मासिक साहित्य जगाशी, भाषेशी मैत्रभाव संवाद साधतं. मी एक शिक्षक, संवादक म्हणून शैक्षणिक उपक्रम यात कार्यरत असतो. याकरिता 'वाचन-संवाद उपक्रम'.. सत्र शाळा, क्लासेस, छोटे विद्यार्थी समूह यांच्यापर्यंत पोहोचवतो... 'किशोर' अनेक विद्यार्थी, शिक्षकांपर्यंत पोहचावे यासाठी मनस्वी शुभेच्छा!

सस्नेह,

**सदानंद टेळके,**
एज्यु संवादक

आमच्या शाळेमध्ये दर महिन्याला किशोर मासिक येते. आम्ही पोस्टमन येण्याची वाटच पाहत असतो. पोस्टमन आल्यावर बाई आम्हांला हे मासिक नियमितपणे वाचायला देतात. 'किशोर' वाचून आम्ही परिपाठात त्यातील कथा सादर करतो. आमच्या शाळेतील अनेक विद्यार्थी आनंदाने कोडी सोडवतात. तसेच भावी आधारस्तंभ यासाठी लेखन करतात. 'किशोर'मुळेच आम्हांला लेखन-वाचनाची प्रेरणा मिळते.

धन्यवाद !

**कु. गार्गी बाळू शिंदे**
(इ.सहावी)
जि. प. प्राथमिक शाळा बौर,
ता. मावळ, जि. पुणे



# छान किती दिसते फुलपाखरू..

हितगुज

**छान किती दिसते। फुलपाखरू**
**या वेलीवर। फुलांबरोबर।**
**गोड किती हसते। फुलपाखरू ।।१।।**
**पंख चिमुकले। निळे जांभळे।**
**हालवुनी झुलते। फुलपाखरू ।।२।।**

प्रसिद्ध कवी ग. ह. पाटील यांची 'फुलपाखरू' ही कविता फुलपाखराचे नेमक्या शब्दांत अचूक वर्णन करते नाही का ? आपल्या परिसरात, आजूबाजूला आढळून येणारे फुलपाखरू प्रत्येकालाच आवर्जून पाहावेसे वाटते. त्याचे रंगीबेरंगी, चिमुकले पंख, लुकलुकणारे बारीक डोळे, वेलींवरून, फुलांवरून त्याचे स्वच्छंदी भिरभिरणे पाहायला, त्याचे निरीक्षण करायला लहानांपासून मोठ्यांपर्यंत सर्वांनाच आवडते. त्यांचे पंख नाजूक व विविधरंगी असल्यामुळे ती मोहक दिसतात. अशी ही फुलपाखरे जगात सर्वत्र आढळतात. सर्व कीटकांमध्ये 'आकर्षक कीटक' ही फुलपाखराची खरी ओळख. फुलपाखरांचा समावेश कीटक वर्गाच्या खवलेपंखी गणात (Lepidoptera) करण्यात येतो. या गणात फुलपाखरांबरोबर आपल्या आजूबाजूला दिसणाऱ्या पतंगांचाही समावेश होतो.

'बटरफ्लाय' हे त्याचे इंग्लिश नाव असले तरी फुलपाखरू म्हणजे माशी नाही. १४ मार्चला सर्वत्र 'जागतिक फुलपाखरू दिवस' साजरा केला जातो. निसर्गाचा मौल्यवान भाग असलेल्या फुलपाखरांचे संरक्षण व्हावे, त्यांचा अधिवास सुरक्षित राहावा आणि जगभरातील नागरिकांमध्ये फुलपाखरांबाबत सकारात्मक जागृती वाढावी या दृष्टिकोनातून जागतिक फुलपाखरू दिवस महत्त्वाचा मानला जातो.

फुलपाखरांचे विविध प्रकार असून, उष्ण प्रदेशांतील वर्षावनांत त्यांच्या सर्वाधिक प्रजाती आढळून येतात. जगभरात किती प्रकारची फुलपाखरे असतील बरं? काही अंदाज आहे का तुम्हांला? संपूर्ण जगभरात फुलपाखरू आणि पतंग यांच्या सुमारे १,७७,५०० इतक्या जाती नोंदवल्या गेल्या आहेत. यांपैकी फुलपाखरांच्या सुमारे १७,५०० जाती आहेत. आणि त्यापैकी भारतात फुलपाखरांच्या अंदाजे १५०० जाती, तर महाराष्ट्रात सुमारे २२५ जाती आढळून येतात. देशातील सुमारे १५ टक्के फुलपाखरे महाराष्ट्रात आढळतात. महाराष्ट्रात आढळणाऱ्या फुलपाखरांना वाघ्या, बिबळ्या कडवा, ढाण्या कडवा, काळू, बहुरूपी, शेंदूर टोक्या, लालटोक्या, केशर टोक्या, हळदी, चित्ता, एरंड्या, छोटा चांदवा, काळा राजा, तपकिऱ्या, चिमी, निलपऱ्या भीमपंखी, लिंबाळी, पानपंखी, शुभ्रपंखी, सोनपंखी, नीलवंत, भिरभिरी, नखरेल मयुरी, स्वैरिणी, भटके तांडेल, सरदार, नीलपरी, भटक्या, अक्कडबाज अशी भन्नाट नावे आहेत. आपल्या पश्चिम घाटातील वनात आढळणारे ब्लू मॉरमॉन (नीलवंत) तथा राणी पाकोळी (शास्त्रीय नाव: पॅपिलिओ पॉलिम्नेस्टर ) हे महाराष्ट्र राज्याचे 'राज्य फुलपाखरू' म्हणून ओळखले जाते. हे फुलपाखरू श्रीलंका व भारताच्या महाराष्ट्र, दक्षिण भारत व पूर्व समुद्र किनारपट्टीच्या क्षेत्रात आढळते. आजघडीला विदर्भापासून पश्चिम महाराष्ट्रापर्यंत त्याचे अस्तित्व आहे.

फुलपाखरांच्या नाजूक, मऊशार रंगीत पंखांचे सर्वांनाच आकर्षण असते. हे पंख नेमके कसे असतात हे तुम्हांला माहीत आहे का? फुलपाखरांचे पंख सूक्ष्मदर्शकाखाली पाहिले असता फुलपाखरांच्या पंखावरील धुरळ्यासारखे लहान रंगीत कण बारीक, चपट्या खवल्यांसारखे दिसतात. हे खवले पोकळ, असतात आणि या पोकळीत अतिशय सूक्ष्म, लहान लहान रंगीत कण भरलेले असतात. या खवल्यांतील रंगीत कणांमुळेच फुलपाखरांचे पंख रंगीत भासतात. त्यांच्या काही जातींमध्ये ऋतुमानांनुसार रंगांत बदल देखील होतात. फुलपाखरांच्या अंड्यांतून सर्वप्रथम अळ्या बाहेर येतात आणि वाढू लागतात. ही वाढ होत असताना या अळ्या चार वेळा कात टाकतात आणि आकाराने मोठ्या मोठ्या होत जातात. चौथ्या वेळेला कात टाकल्यानंतर अळीचे कोशात रूपांतरण होते. आणि मग फुलपाखरू कोशातून बाहेर येते. याला आपण 'सुरवंटाचे सुंदर फुलपाखरात रूपांतर होणे' असे म्हणतो.


फुलपाखरे वनस्पतींच्या परागीभवनासाठी मदत करून निसर्गाचे सरंक्षण करण्यास मोलाची मदत करतात. फुलांची, झुडपांची आणि झाडांची फलधारणा करण्यात हातभार लावतात. ती माणसाला, प्राण्यांना कोणत्याही प्रकारे इजा पोहोचवत नाहीत. बहुतेक फुलपाखरे काही आठवड्यांपेक्षा अधिक काळ जगत नाहीत, तर त्यांच्या काही जाती १८ महिन्यांपर्यंत जगू शकतात. ही अल्पायुषी असणारी सर्वच फुलपाखरे अतिशय कष्टाळू असतात. कमी आयुष्य लाभून देखील न थकता निसर्गाने दिलेले कार्य पार पडतात. अशी ही सुंदर फुलपाखरांची हसरी दुनिया आहे. मात्र इतर वन्यप्राण्यांबरोबरच फुलपाखरासारख्या निष्पाप जीवालाही आंतरराष्ट्रीय तस्करी बाजारात मोठी मागणी आहे. त्यातच जगभरात मोठ्या प्रमाणत होणारे काँक्रिटीकरण, जंगलतोड त्यांच्या अस्तित्वाला धोका निर्माण करत आहे. तुम्ही फुलपाखरांना असणाऱ्या धोक्यांबाबत जरूर जाणून घ्या आणि आपल्या शाळेत, परिसरात याबाबत जागृती घडवून आणून 'जागतिक फुलपाखरू दिवस' साजरा करा.

किरण केंद्रे
**कार्यकारी संपादक**

# मारीआनाचे माही

मेघश्री दळवी

कॅप्टन महेंद्रसिंगने उंच फडफडणाऱ्या तिरंगा ध्वजाला कडक सॅल्युट ठोकला आणि ते कॅमेऱ्यासमोर आले. ''आज माझ्या आयुष्यातला सर्वात महत्त्वाचा दिवस आहे. जगातल्या सर्वात खोल जागी, दहा हजार मीटरहूनही अधिक खोल अशा मारीआना ट्रेंचमध्ये आजवर केवळ चौदा व्यक्ती प्रवास करून आल्या आहेत. तिथे जाणारा पहिला भारतीय हा बहुमोल सन्मान मला मिळाला आहे, हे मी माझं भाग्य समजतो. भारतीय नौदलाचा एक अधिकारी म्हणून मी भारताचं प्रतिनिधित्व करत आहे. आणि मला खात्री आहे की सर्व भारतीयांचे आशीर्वाद माझ्या पाठीशी आहेत.'' सगळ्या उपस्थित मंडळींनी टाळ्यांचा कडकडाट केला. आम्ही मित्रमंडळी घरी बसून टीव्ही बघत होतो. आम्हीही जोराजोरात टाळ्या वाजवल्या.



''अवकाशात पाऊल ठेवणारे पहिले भारतीय होते एअर फोर्सचे विंग कमांडर राकेश शर्मा. सर्वात उंच शिखर एव्हरेस्टवर चढाई करून जाणारे पहिले भारतीय होते आर्मीचे लेफ्टनंट कर्नल अवतार सिंग चीमा. आणि आता सर्वात खोल जागी जाणारे पहिले भारतीय आहेत नेव्हीचे – कॅप्टन महेंद्रसिंग!'' आयोजकांनी घोषणा केली. ''माही, माही!'' कुठूनतरी आवाज आला तेव्हा कॅप्टन महेंद्रसिंगच्या चेहऱ्यावर खूप मोठं हास्य उमललं. आम्हीही इथे माही, माही म्हणायला लागलो. मारीआना ट्रेंचमध्ये जाण्यासाठी त्यांची निवड झाली तेव्हा कुठल्यातरी मुलाखतीत त्यांची आई त्यांना माही म्हणाली. तेव्हापासून सगळ्या भारतभर 'माही' म्हणून ते प्रसिद्ध झाले. आता तर त्यांची ओळख साऱ्या जगात 'मारीआनाचे माही' अशीच झाली होती.

''मारीआना ट्रेंच पॅसिफिक महासागरात फिलीपाइन्सच्या जवळ आहे.'' टीव्हीवरचा निवेदक बोलायला लागला तसे मी कान टवकारले. बाबा मागे एकदा कामासाठी चार महिने फिलीपाइन्सला होते. म्हणजे मारीआना ट्रेंचच्या कितीतरी जवळ!

टीव्हीवरच्या निवेदकाचं बोलणं सुरू होतं. तिथली खोली जवळजवळ अकरा हजार मीटर आहे. म्हणजे एव्हरेस्ट पर्वत उलटा केला तरी तो तिथे पोहोचू शकणार नाही, इतकी. या खोलीवर पाण्याचा दाब हजारपटीने जास्त असतो, आणि पाणीही भरपूर थंड असतं.'' हे ऐकून मला एकदम गार पाण्याचे लोटच्या लोट अंगावर आल्यासारखे वाटले. एकदा आम्ही एका वॉटर पार्कला गेलो होतो, तिथे असाच मस्त धबधबा होता!

''गंमत म्हणजे तिथे अगदी चित्रविचित्र प्राणी दिसतात. म्हणजे अमीबा असेल तर भला मोठा. साध्या डोळ्यांना दिसेल एवढा. मासे एकदम पारदर्शक, झिंगे म्हटले तर सुपरजायंट आकाराचे. तिथे अतिशय सूक्ष्मजीवही राहतात. एरव्ही आपल्याला समुद्रात दिसत नाहीत असे अतरंगी.''

''आई, बघ ना. कसं विलक्षण आहे ना?'' मी आईकडे वळून म्हटलं. ''तिथे सूर्याचा प्रकाश पोहोचत नाही म्हणजे काळामिट्ट अंधार असणार. आणि पाणी गारेगार. कसे रहात असतील ना हे मासे?''

''हो, ना.'' आईने मान डोलावली. ''आता हे मारीआनाचे माही जातील ना, ते सगळं पाहतील आणि वर येऊन वर्णन करतील. काय सुंदर संधी मिळाली आहे त्यांना!''

टीव्हीवर आता एक पाणबुडी दिसायला लागली. आपल्या नौदलाने समुद्रात खोलवर जाण्यासाठी ती तयार केली होती. शक्ती असं तिला नाव दिलं होतं. आणि ती तशीच मजबूत शक्तिमान होती.

आता निवेदक या पाणबुडीबद्दल सांगायला लागला. ''या शक्ती पाणबुडीच्या भिंती दहा सेंटीमीटर जाडीच्या टायटॅनियमच्या आहेत. तिला एक मोठी काचेची खिडकी आहे. या खिडकीतून आपले कॅप्टन माही व्हिडिओ आणि फोटो घेणार आहेत. शक्तीच्या बाहेरच्या बाजूला वॉटरप्रूफ कॅमेरेसुद्धा बसवले आहेत. त्यातले दोन कॅमेरे आधीच समुद्रतळाशी जाऊन बसणार आणि शक्ती वरून खाली येताना फिल्मिंग करणार.''

''आई, हे व्हिडिओ आपल्याला पहायला मिळतील का गं?'' मी विचारलं.

''हो वाटतं. बघूया कधी दाखवणार ते.''

''कॅप्टन माही अकरा हजार मीटर इतक्या खोलीवर जाणार आहेत. आणि पाच तास ते पाण्याखाली असतील. पण त्यांना सोळा तास पुरेल इतक्या ऑक्सिजनची व्यवस्था केलेली आहे.'' निवेदक बोलताना आता शक्तीचे क्लोजअप दिसायला लागले.

''आई! आता शाळेतल्या पुढच्या प्रोजेक्टला मी शक्तीचं मॉडेल बनवणार! आपल्याला ऑनलाइन माहिती मिळेल ना?''


''मिळेल की!'' आईला पण माझी आयडिया आवडली.

''आपल्या नौदलाचं एक मोठं जहाज शक्तीला इथे घेऊन आलं आहे.'' निवेदक रसाळपणे सांगत होता. ''मारीआना ट्रेंचच्या जवळ. आता शक्ती पाणबुडी खाली जाईल तेव्हा या जहाजाशी सतत संपर्क करता येईल अशी खास यंत्रणाही शक्तीत बसवलेली आहे. एरव्हीच्या पाणबुड्या काही खोलीवर जाऊन

निरनिराळ्या दिशेने प्रवास करू शकतात. शक्ती मात्र एकाच ठिकाणी हळूहळू खालच्या दिशेने जाणार आहे, आणि कामगिरी फत्ते झाली की मग तशीच सावकाश वर येणार आहे.''

मी दोनचार उड्या मारल्या आणि पुढच्या गोष्टींकडे उत्साहाने बघायला लागलो. मला हे सगळं नीट बघायचं होतं आणि माझं मॉडेल एकदम परफेक्ट करायचं होतं! जहाजातून शक्ती खाली सोडायला सुरुवात झाली. मजबूत दोरखंडाची गुंडाळी उलगडायला लागली. पाणबुडी किती खोल जाते आहे याची माहिती स्क्रीनवर दिसायला लागली. मी तर एवढा एक्साइट झालो होतो! 'मारीआनाचे माही' परत आल्यावर सगळीकडून त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव झाला. आपल्या भारत सरकारने त्यांना सन्मानपत्र बहाल केलं. वेगवेगळ्या संस्थांनी सुद्धा त्यांचा सत्कार केला. कितीतरी चॅनेल्सनीही त्यांच्याबरोबर कार्यक्रम केले. मी त्यांच्या मुलाखती टीव्हीवर बघत होतो. त्यांनी व्हिडिओ दाखवले तेसुद्धा मी पुन्हा पुन्हा ऑनलाईन बघितले. आणि काय आश्चर्य! एक दिवस आमच्या शहरातच माही येणार असं जाहीर झालं. मी उड्या मारत घरात जाहीर केलं की मी या कार्यक्रमाला जाणार. बाबा तर या वेळी श्रीलंकेला गेले होते. मग काय! मी, आई, आणि आजोबा, आम्ही तिघांनी जायचं ठरवलं. आजोबांनी कुठेतरी जाऊन कार्यक्रमाचे पासेस आणले.

कार्यक्रमाच्या दिवशी आम्ही तयारी करून वेळेवर पोचलो. खूप मोठं मैदान आणि कडक सुरक्षा होती. माही स्टेजवर आल्यावर टाळ्यांनी मैदान दुमदुमून गेलं. त्यांनी हात हलवून दाखवला आणि बोलायला सुरुवात केली. बाजूला मोठ्ठ्या स्क्रीनवर फोटो आणि व्हिडिओ दाखवत होते. इतक्या खोलवर अनेक मासे स्वत:च प्रकाश निर्माण करत होते. तर काही मासे मिट्ट काळोखातही आरामात सैर करत होते. काही वेळा मोठाले जलचर जीव माहींच्या कॅमेऱ्याच्या प्रकाशाकडे येत होते. एकाने तर जबडा एवढा उघडला की त्याचे फताडे दात एक एक मोजता येतील. सगळं पाहताना आम्ही रंगून गेले होते. आठ हजार मीटर खोलीवर त्यांना एक तीन इंची दुरंगी किडा दिसला होता. एका बाजूला गुलाबी आणि दुसऱ्या बाजूला फिकट निळा अशा या



अनोखी किड्याला दोन्ही बाजूंनी डोळे होते. इतक्या प्रचंड खोलीवर सगळीकडे अंधार असताना या किड्याला डोळे कशासाठी असतील? आम्हांला ऐकताना खूप कुतूहल वाटत होतं.

''मारीआनाचे माही काय अजब जागी गेले ना? मला तर वाटतं की मी पण कधीतरी असा जाईन!'' मी म्हणालो.

आजोबा हसले आणि त्यांनी माझी पाठ थोपटली. आईने नेहमीसारखी मान डोलावली. आम्ही खूपदा समुद्रावर फिरायला जातो, शंख-शिंपले गोळा करतो. वाळूत किल्ले बांधतो. कधी कधी माझे मित्रसुद्धा असतात. पण आईबाबा अजून समुद्रात पोहायला पाठवायला तयार नाही होत. विहिरीत नाहीतर, तळ्यात पोहायला आम्हांला परवानगी आहे, पण समुद्रात नाही. अशा वेळी समुद्रात इतक्या खोल जाण्याची कल्पना मला तर अद्भुत वाटत होती!

माहींचं भाषण संपलं आणि स्टेजवरच्या निवेदकाने त्यांना विचारलं,

''माही, तुम्ही समुद्राच्या तळाच्या गमतीजमती खूप सांगितल्या. मला खात्री आहे की हा कार्यक्रम पाहणाऱ्या सर्वांना ही अनोखी सफर मोठी अपूर्वाईची असेल. या सगळ्यात अशी कोणती गोष्ट आहे की ती तुमच्या कायम लक्षात राहील?''

माहींची थोडी चलबिचल झाली. मग ते म्हणाले,

''सर्वात लक्षात राहील ते प्लॅस्टिक. हो, प्लॅस्टिक. समुद्रात सर्वात खोल जागी माणूस रहात नाही, पण प्लॅस्टिकने तिथे मुक्काम ठोकलाय. एक नाही, दोन नाही, तर तब्बल नऊ प्लॅस्टिकचे तुकडे मी पाहिले. ते कुठून आले असतील?''

आम्ही सारे थक्क होऊन पाहत राहिलो.

''आपण वापरतो ते प्लॅस्टिक कचऱ्यात जातं आणि मग कुठून कुठून प्रवास करून समुद्रात जातं. मग हेच प्लॅस्टिक बहुधा समुद्राच्या प्रवाहांमधून मारीआना ट्रेंचमध्ये पोहोचलं असावं. साधारण आठ हजार मीटर खोलीवर एका गोगलगाईच्या अंगावर मी प्लॅस्टिकची झूल पाहिली, आणि सांगतो, मी अतिशय हताश झालो.''

माहींच्या चेहऱ्यावर खूप दु:ख दिसत होतं.

''तुम्हांला माहीत आहे, कागदी, कापडी गोष्टींचं हळूहळू विघटन होतं. प्लॅस्टिक मात्र वर्षानुवर्षं तसंच रहातं. त्याचे लहान लहान तुकडे होतात, पण ते पूर्ण नष्ट कधीच नाही होत. हे तुकडे हवेतून, पाण्यातून सगळीकडे पसरतात. खाण्यातून आपल्या पोटात जातात, श्वासातून आपल्या फुप्फुसात जातात. आपण आपलं आरोग्य धोक्यात घालतो, वर या प्राण्यांचंही. त्यांना तर बिचाऱ्यांना प्लॅस्टिक काय तेही माहीत नसतं. का आपण नैसर्गिक परिसरात असे कृत्रिम पदार्थ टाकतो आहोत? का आपण आपल्यासोबत या प्राण्यांना त्रास देतो आहोत? अगदी थेट खोलवर मारीआनामध्ये?''

आजूबाजूचे सगळे अस्वस्थ झाले. माहींनी पुढे बोलायला सुरुवात केली.

''आणि हे मी सांगतो आहे विशेष करून आपल्या मुलांना. आम्ही उद्या नसू, पण तुम्ही असाल. या जगात जे काही सुंदर आहे त्याचा तुम्ही आस्वाद घेत असाल. खळाळत्या नद्या, उंच हिरवेगार डोंगर, घनदाट जंगलं, निळेशार समुद्र, या सगळ्यात बागडणारे तऱ्हेतऱ्हेचे प्राणीपक्षी. पण हे जग असं सुरेख राहील का? आपण जर आज त्याचं जतन केलं नाही, तर उद्या ही पृथ्वी गलिच्छ, प्रदूषित, भकास, उजाड झालेली असेल. आपल्या वागण्याने या पृथ्वीवरचा समतोल तर ढळणार नाही ना, याची आपल्याला काळजी घ्यावी लागेल. माझ्या या मारीआनाच्या प्रवासातून माझे डोळे तर उघडले. तुम्हां सर्वांचेही उघडावेत ही मी आशा करतो.''

त्यांचं बोलणं संपलं तेव्हा तर निवेदकही एकदम चूप झाला. कोणालाच काही बोलावंसं वाटत नसणार. माझीसुद्धा मघापासूनची बडबड थांबली. कारण 'मारीआनाचे माही' जे सांगून गेले, ते अगदी बरोबर होतं. प्लॅस्टिक आपण सगळे वापरतो. पण ते मारीआनापर्यंत जात असेल मला कल्पनाच नव्हती. माहींचे शब्द आता कायम माझ्या मनात राहतील आणि प्लॅस्टिकच्या वस्तू राहतील दुकानात!

**संपर्क : ९८२०१४४६५७**

# ❋ चला चित्र रंगवूया...!!!

धनश्री केळकर



# रंगसंगती

जितेंद्र कुवर



हिरवी शेतं
तांबडी पहाट
निळे तळे
भुरकट वाट

मंद मारवा
शांत पारवा
फांदीवरला
होल्या हिरवा


लाल केशर
पित बहावा
शुभ्र मोगरा
रजत चांदवा

नारंगी मोसंबी
सोनेरी ऊन
तपकिरी धूळ
जांभळे जामून

करडी बाभूळ
काळा कावळा
मातकट पिंगळा
बगळा ढवळा

वेडे वेडे
पार खुळे
वासराचे डोळे
जांभूळ निळे

संपर्क : ७७७६९८४०२८



# "मोठेपणी तू कोण होणार?"

मुकुंद टाकसाळे

चिनू, मोठेपणी तू कोण होणार?

चिनू म्हणजे आपला चिन्मय म्हणजेच ढोलूराम. चिनूला लहानपणी एका प्रश्नाला कायम तोंड द्यावं लागायचं. घरी कुणी पाहुणे आले की ते त्याला 'नाव काय', 'कितवीत आहेस' वगैरे विचारून झालं की कधी ना कधी तरी पण हमखास प्रश्न विचारायचे, ''चिनू, मोठेपणी तू कोण होणार?'' या प्रश्नाला लहानग्या चिनूनं कधीही एक उत्तर दिलं नाही. प्रत्येक वेळी वेगळं उत्तर. कधी तरी तो अंतराळाविषयीची माहिती वाचत होता . तेव्हा आलेल्या एका काकांना त्यानं 'मोठेपणी मी अंतराळवीर बनणार' असं उत्तर दिलं होतं.

अंतराळवीर म्हणजे? ''काकांनी तोंडाचा आ वासून विचारलं.''

''ॲस्ट्रॉनट.''

''अच्छा. का बुवा? ॲस्ट्रॉनट का?''

''कारण मला तिथं अंतराळात जाऊन आपली पृथ्वी कशी दिसते आहे ते पाहायचं आहे.''

आकाशात लांबवर दिसणारं विमान पाहिलं की त्याला वाटायचं वैमानिक व्हावं, ढगांच्या वर जाऊन तिथं काय आहे ते पाहावं. शाहरुख खानचा चित्रपट पाहताना त्याच्या फायटिंगला टाळ्या पडल्या की त्याला वाटायचं, मोठेपणी असं सिनेमात जाऊन ढिश्यांव



ढिश्यांव करत पाच दहा गुंडांना आडवं करावं. पण एकदा तर ढोलूरामला मोठेपणी सोसायटीचा वॉचमन व्हावं असंही वाटून गेलं होतं. आळशी ढोलूरामला वाटलं, हे किती छान काम आहे. मस्तपैकी सोसायटीच्या फाटकापाशी खुर्ची टाकून बसायचं गाडी आली की फाटक उघडायचं. नंतर बंद करायचं. झालं काम. पण एकदा मात्र ढोलूरामला कोण व्हायचं होतं ठाऊक आहे? त्याला व्हायचं होतं जादूगार.

झालं असं की, शाळेच्या रस्त्यावर एक म्हातारा जादूगार जादूचे प्रयोग करताना त्यानं पाहिलं. हा जादूगार अगदी साधासुधा होता. डोक्यावर पांढरी टोपी, धोतर, बिन इस्त्रीचा सदरा असे कपडे घालणारा. त्याच्या भोवती गर्दी जमलेली होती. त्या गर्दीतच ढोलूरामही थांबला. जादूगारानं काय काय जादू केल्या. टोपीत रंगीत कागद टाकला आणि क्षणात त्याचा रंगीत हार बनवून बाहेर काढला. नंतर त्याच रिकाम्या टोपीतून एक ससा काढला. अशाच कुणाला तरी पत्त्याच्या कॅटमधून एक पान घ्यायला लावलं. मग ते पुन्हा कॅटमध्ये मिसळलं. पत्ते पिसले. आणि नंतर ते लगेच काढून त्याच्या हाती दिले. त्यानं केलेली एक जादू तर छोट्या ढोलूरामला फारच आवडली. त्यानं जमिनीवरची माती उचलली आणि ती एका छोट्या लाकडी पेटीत टाकली. झाकण लावलं. आणि नंतर क्षणात झाकण उघडलं तर काय तिथं शंभराची कोरी करकरीत नोट! मग त्यानं ढोलूरामला जवळ बोलावलं. त्याच्या खिशात ती नोट ठेवली. कुण्या तिसऱ्याला बोलावलं आणि त्याच्या खिशातून ती नोट काढायला सांगितली तर काय आश्चर्य! शंभरची नोट आता दोनशेची झाली होती. ती नोट तिसऱ्याच्या खिशात ठेवली. चौथ्याला काढायला लावली. तर त्यानं पाचशे रुपयांची नोट बाहेर काढली. ढोलूरामची आश्चर्यानं पाचही बोटं तोंडात गेली होती. साध्या मातीपासून शंभर, दोनशे, पाचशे रुपयाची नोट! ग्रेट! आपल्याला ही जादू आली तर कित्ती मज्जा येईल. आपण खूप श्रीमंत होऊ असं ढोलूरामच्या मनात येऊन गेलं. शेवटी जादूगारानं त्याची टोपी काढून तिथं जमलेल्या लोकांपुढे फिरवली. कुणी त्यात रुपया, दोन




रुपये, पाच रुपये टाकले. बहुतेक जण फुकटात जादू बघून हळूच मागल्या पावलांनी निघून गेले. गर्दी आता पांगली होती. आपली धोपटी उचलून जादूगार आता दुसरीकडे निघाला होता. ढोलूराम त्याच्याशी बोलत बोलत त्याच्या बरोबर चालू लागला.

''जादूगारकाका, मला जादू शिकवाल का?'' त्यानं विचारलं, ''मला ना तुमच्यासारखं जादूगार व्हायचं आहे मोठेपणी.''

''खूप वेळ लागेल तुला शिकायला. अशी जाता जाता नाही शिकवता यायची.''

''मी आई-बाबाला विचारून मे महिन्याच्या सुट्टीत तुमच्या घरी राहायला येईन.''

''माझं घर म्हणजे छोटी झोपडी आहे. तुला तिथं राहावं लागेल.''

''चालेल मला. मी नक्की येईन. पण तुम्ही आज मला एक जादू शिकवा.''

''कुठली जादू शिकायची आहे तुला?''

''ती मातीपासून शंभर रुपयाची नोट बनवण्याची. नंतर शंभराची नोट दोनशेची आणि दोनशेची नोट पाचशेची करण्याची.''

''जादू शिकवण्यासाठी तू मला काय फी देशील?''

आता ढोलूराम जरा गप्प बसला. मग त्याला



आठवलं. सकाळी शाळेत निघताना आईनं येताना भाजी आणायला सांगितली होती. त्यासाठी तिनं त्याला पन्नास रुपयांची नोट दिलेली होती. त्यानं मागचा पुढचा विचार न करता ती नोट खिशातून काढली आणि त्याला दिली.

जादूगार त्याला म्हणाला, ''ही कुठली नोट?''

''आईनं मला भाजी आणायला दिली आहे.''

''मग आई तुला विचारणार नाही का नोट कुठं गेली म्हणून?''

''विचारील ना. पण तुम्ही मला जादू शिकवली की मी मातीपासून शंभर रुपये बनवीन. पन्नास रुपयांची भाजी आणीन. शिवाय मला पन्नास रुपये मिळतील. मग त्याचे मी असेच दुप्पट तिप्पट रुपये बनवीन.'' ढोलूराम म्हणाला.

जादूगार यावर मोठमोठ्यानं हसायला लागला. त्याच्या डोक्यावर टपली मारून तो म्हणाला, ''अरे, आमची सारी हातचलाखी असते, बाळा. अशा मातीपासून जर आम्हांला खऱ्याच नोटा बनवता आल्या असत्या तर मी नंतर टोपी फिरवून एक दोन रुपये मागितले असते का लोकांकडे? मी असा धोपटी घेऊन उन्हापावसाचा गावोगाव हिंडत बसलो असतो का?'' जादूगाराचा हा मुद्दा ढोलूरामच्या लक्षातच आला नव्हता. तो लगेचच त्याला पटला. जादूगार त्याच्या खिशात त्याचे पन्नास रुपये ठेवून म्हणाला, ''या पैशांची तू भाजी आण आणि आईला नेऊन दे. जा बेटा''

आणि तो जादूगार पाय ओढत चालू लागला. ढोलूराम त्याच्याकडे पाहतच राहिला.

**संपर्क : ९८५०८१७२१०**



गणेश भाकरे

# चिमणी पाखरं

आई सांगायची मला
नको मारू काही तिला,
मुकी चिमणी पाखरं
काय मागतात तुला

एका दाण्यासाठी त्यांची
बघ धावपळ किती,
चिव चिव करुनिया
हाक तुला मला देती

ठेव भांड्यामध्ये पाणी
काही मूठभर दाणे,
तुझ्या माझ्या संगतीनं
तिला गाऊ दे रे गाणे

बघ त्यांच्या वागण्यात
कुठे आहे हेवादावा,
कसा दाण्यांच्या शोधात
उडे आकाशात थवा


गुण्यागोविंदानं चिऊ
फिरे दारोदारी खास,
कशी पिलांना भरते
भूक लागताच घास

नको मारू बाळा तिला
साधं मातीचं ढेकूळं,
काही क्षणांसाठी होते
तुझं अंगणं गोकूळ

तुझा माझा जसा आहे
तसा आहे त्यांचा जीव,
प्रत्येकाच्या जीवामध्ये
एक बसतो रे देव



संपर्क : ९९२३८२९७१७



# संकल्प पाणी बचतीचा

विनायक ढवळे

‘‘वरुण, आधी तो वॉश बेसिनचा नळ बंद कर पाहू. तुला कित्येकदा सांगितलंय की पाणी जपून वापरत जा. नळ सोडून ठेवून तोंड धुऊ नकोस म्हणून’’ आईने आतल्या खोलीतून आवाज दिला.

‘‘अगं आई, आपल्याकडे पाणी कधीच जात नाही. तरी तू का मला आपली सारखी ओरडते की, पाणी जपून वापर म्हणून...’’ वरुण म्हणाला.

‘‘अरे आपल्याकडे जरी पाणी भरपूर असलं तरी ते वाया घालवू नये. त्याचा वापर जपूनच करावा. बऱ्याच लोकांना जरुरीएवढं सुदधा पाणी मिळत नाही. पाण्याची नासाडी करू नये. आता तू सहलीला जायच्या गडबडीत आहेस तेव्हा मी तुला जास्त काही सांगत नाही. नंतर सवडीने बोलेन हो तुझ्याशी.’’ आई.

आईनं वरुणला सहलीसाठी डबा करून दिला. त्याची पाण्याची बाटली भरली तशी स्वारी खुशीत शाळेत निघाली. आज त्याच्या वर्गाची सहल जाणार होती. नेहमीपेक्षा वेगळ्या ठिकाणी. शहरापासून तासाभराच्या अंतरावर असणाऱ्या एका शेतावर.

वरुण शाळेत पोहोचला तेव्हा बहुतेक विद्यार्थी आले होते. आज सर्वांच्या अंगातून उत्साह ओसंडून वाहत होता. एकमेकांच्या डब्यात काय आणलंय, सहलीत कशी धमाल करायची याच्या गप्पा सुरू झाल्या. सर्वांना बसमध्ये कधी बसेन असं झालं होत. तेवढ्यात जोशी सरांनी वर्गात प्रवेश केला. त्यांनी सर्वांची उपस्थिती नोंदवली. आज सर्व जण हजर होते. १००% उपस्थिती. त्यांनी विद्यार्थ्यांना आवश्यक सूचना देऊन बसमध्ये बसायला सांगितलं.

सर्व विद्यार्थी बसमध्ये बसले आणि मग बस निघाली. थोड्याच वेळात बसनं वेग घेतला. शहराबाहेर आल्याने रस्त्याच्या दोन्हीही बाजूला झाडे दिसू लागली. अर्धा-पाऊण तास झाला असेल. वरुणने खिडकीतून बाहेर नजर टाकली. दोन-चार स्त्रिया डोक्यावर हंडे घेऊन जाताना दिसल्या. जोशी सर त्याच्या शेजारीच बसले होते.

''सर, त्या स्त्रिया डोक्यावर हंडे घेऊन कुठं निघाल्यात?'' वरुणने जोशी सरांना विचारलं

''त्या पाणी आणायला निघाल्यात'' सर उत्तरले.

''त्यांच्या घरी पाणी येत नाही?'' वरुण

शहरातल्या सारखी पाण्याची चैन या करू शकत नाहीत. कारण बऱ्याचशा दुर्गम वाड्या-वस्त्यांवर अजूनही नळाद्वारे पाण्याची सोय झालेली नाही. त्यामुळे बिचाऱ्यांना बरेचदा चार-चार, पाच-पाच मैलांवरून मिळेल त्या आडातून, विहिरीतून पाणी आणावं लागत. उन्हाळ्यात दुष्काळ असताना तर डोक्यावर चटके बसत असताना देखील पाण्यासाठी भटकंती करावी लागते. जोशी सरांनी त्याच्या माहितीत भर टाकली.

वरुणने ते सगळं ऐकलं आणि तो हिरमुसला झाला. सकाळी आई आपल्याला का ओरडली याचा उलगडा त्याला आता झाला.

थोड्या वेळानं बस थांबली तशी सर्व मुलं पटापट खाली उतरली. तेवढ्यात डोक्याला मुंडासं गुंडाळलेले शेतकरी दादा समोर आले. त्यांनी सरांना नमस्कार केला आणि विद्यार्थ्यांचा ताबा घेतला. मुलं त्यांच्या मागं-मागं जाऊ लागली. शेतकरी दादांनी त्या सर्वांना शेतीची विविध अवजारे दाखवली. नांगर कसा चालवतात, खुरपणी कशी करतात ते दाखवलं. मुलांना ते सर्व नवे होते. पुढे जाता-जाता विद्यार्थ्यांना शेताच्या कडेला असणाऱ्या झाडांना पाण्याच्या बाटल्या उलट्या बांधलेल्या दिसल्या. सर्वांना आश्चर्यच वाटले.

''आजोबा या झाडांना उलट्या बाटल्या कशाला बांधल्या आहेत'' वरुणने आपली जिज्ञासा प्रकट केली.

''मुलांनो या बाटल्यांमध्ये आम्ही पाणी भरतो. ते थेंबा-थेंबांनी झाडाच्या मुळाशी पाहोचते आणि तिथून सर्व झाडाला मिळते. यामुळे झाडाला आवश्यक तेवढेच पाणी मिळते आणि त्या बरोबर पाण्याचीही बचत होते.'' शेताच्या कडेला तऱ्हेतऱ्हेची झाडे होती त्याची माहिती ऐकण्यात सर्व जण गुंग झाले. नंतर त्यांनी मुलांना बैलगाडीतून छोटीशी सफर घडवली. मुलं पहिल्यांदाच बैलगाडीत बसत असल्यानं त्यांना फार मौज वाटली.

सहल फेरफटका करीत पुढं आली. बाजूला एक विहीर होती. तिचं पाणी थंडगार तर होतंच पण साखरेसारखे गोडंही होत. काही मुलांनी तर आपापल्या पाण्याच्या बाटल्यासुद्धा भरून घेतल्या. शेतकरी दादांनी सर्वांना विहिरीतून पाणी कसं काढायचं ते दाखवलं. ते पाहून वरुण आपल्या मित्रासह पुढं झाला.

''आजोबा आम्ही काढू का, विहिरीतून पाणी'' वरुणने विचारले.

''काढा की'' शेतकरी दादांनी परवानगी दिली. वरुण आणि त्याच्या मित्रानं दोरी धरून पाण्याची बादली आत टाकली खरी पण भरलेली पाण्याची बादली त्यांच्याच्याने खेचवेना. ते घामाघूम झाले तसे शेतकरी दादा म्हणाले,

''आता कळलं ना, किती मेहनत घ्यावी लागते पाणी उपसण्यासाठी. म्हणून त्याचा अपव्यय करू नये, जमेल तेवढा पुनर्वापर करावा.'' सर्वांनी माना डोलावल्या.

मुलांच्या भुकेची वेळ झाली. सर्व जण आपापले डबे काढून जेवायला बसले. शेतातल्या आजोबांनी त्यांना गोड-गोड पेरू आणि आंबट-गोड कैऱ्या दिल्या. ताज्या-ताज्या फलाहाराने त्यांचे चेहरे खुलले. जेवणं झाली. आता सर्व जण उठणार तेवढ्यात जोशी सर पुढे

झाले आणि म्हणाले, ''मुलांनो हात इकडेतिकडे न धुता समोरच्या झाडांच्या बुंध्याजवळच धुवा म्हणजे पाणी वाया जाणार नाही आणि झाडाला पाणी मिळेल.'' सगळ्यांना सरांचे म्हणणे पटलेच परंतु त्यापेक्षा आपण रोज घरी हात-पाय धुताना किती पाणी वाया घालवतो याची जाणीवही झाली.

सहल संपवून विद्यार्थी आता शाळेकडे परतणार तोच शेतकरी दादा पुढं झाले आणि विद्यार्थ्यांना म्हणाले.

''बाळांनो आता निघताना सर्वांना एक गोष्ट मिळणार आहे. ती जपून घरी न्यायची आणि तिचा चांगला उपयोग करावयाचा.''

''कोणती गोष्ट, आजोबा?'' सर्वांनी एकच प्रश्न केला.

तसे जोशी सर पुढे होऊन म्हणाले, ''प्रत्येकाला एक-एक 'सीड-बॉल' मिळणार आहे. म्हणजे मातीच्या गोळ्यात झाडाचं बी असेल. घरी गेल्यावर तुमच्याकडे जिकडे जागा असेल तिकडे बी पेरा आणि घरी वाया जाणारे पाणी त्याला घालून त्याला वाढवा. म्हणजे काय होईल वृक्ष लागवडीला तुमच्या सर्वांचा हातभार लागेल. ज्यांना घरी शक्य होणार नाही त्यांनी शाळेच्या आवारात सीड-बॉलचा वापर करून झाड लावा आणि रोज त्याला पाणी घालून ते मोठे करा.''

''सर्वांना जमेल ना?''

''हो सर, आम्ही नक्की करू''

सहल परतीच्या मार्गावर निघाली आणि थोड्याच वेळात शाळेत पोहोचली सुद्धा. शाळेत शिरताना जोशी सरांचं लक्ष शाळेच्या आवारातील एका रिकाम्या टाकीकडे गेले आणि त्यांच्या चेहऱ्यावर एक नवीन कल्पना सापडल्याचा आनंद दिसू लागला. त्यांनी परत एकदा उपस्थिती घेऊन सर्व विद्यार्थी परतल्याची खात्री करून घेतली आणि विद्यार्थ्यांकडे पाहून म्हणाले,

''आज घरी जाण्यापूर्वी आणि रोज शाळा सुटल्यानंतर सर्वांनी न चुकता एक गोष्ट करायची.''

''कोणती सर?''

''तुमच्या सर्वांच्या पाण्याच्या बाटलीमध्ये जेवढे पाणी उरले आहे ते फुकून न देता शाळेच्या आवारातील रिकाम्या पाण्याच्या टाकीत जमा करावयाचे.''

''पण त्याचा काय उपयोग? सर्वांचं उष्ट पाणी जमा करून त्याचं काय करणार?'' विद्यार्थ्यांनी प्रश्न केला.

''सांगतो, सांगतो'' जोशी सर म्हणाले. ''तुमच्या पाण्याच्या बाटलीतले पाणी, टाकीत जमा होईल. अशा प्रकारे जमा झालेले पाणी शाळेच्या आवारातील झाडांच्या उपयोगी पडेल, तसेच शाळेच्या स्वच्छता-गृहाची सफाई करण्यासारख्या इतर गोष्टींच्या कामी येईल. एक रबराच्या नळीने हे सहज शक्य आहे. तेव्हा आजपासून सर्वांनी संकल्प करा घरीदारी सर्वत्र पाणी वाचवा.'' सर्व विद्यार्थी आपापल्या जागेवरून उठले आणि पटापट आपल्या बाटलीतले पाणी टाकीत जमा केले. बघता-बघता ती अर्धी-मुर्धी भरली सुद्धा. सर्वांना कळले पाणी बचतीचे महत्त्व.

सर्व मुले खुशीत, नव्या आनंदात घरी परतली. पाणी बचतीचा नवा संकल्प करून आणि जोशी सरांच्या चेहऱ्यावर सहलीचा उद्देश सार्थकी लागल्याचं समाधान दिसू लागलं.

**संपर्क : ९४२३५८२३६५**

**'किशोर' हे मासिक मालक, महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ, बालभारती यांचेकरिता, मुद्रक व प्रकाशक विवेक उत्तम गोसावी यांनी सोहेल एंटरप्रायजेस, सर्व्हे नं.४८, घर पट्टी नं.४०२, भांडार्ली व्हिलेज, नॅशनल काट्याजवळ, ठाणे-४०० ६१२ येथे छापून 'बालभारती', सेनापती बापट रोड, पुणे-४११ ००४ येथे प्रसिद्ध केले. ⁕ संपादक – कृष्णकुमार पाटील.**

**'Kishor' monthly publication is owned by Bureau of Textbook Production and Curriculum Research, Balbharati, Printed and Published by Vivek Uttam Gosavi, Printed at M/s. Sohail Enterprises, S.No. 48, Ghar Patti No. 402, Bhandarli Village, Near National Kata, Thane-400 612 and Published at Balbharati, Senapati Bapat Road, Pune-411 004. ⁕ Editor - Krishnakumar Patil.**



# घुबड

प्रा. सय्यद अल्लाउद्दीन

घुबडाला होता
झोपायचा खूप नाद !
मग काय !
रात्रंदिवस
झोपायचा निर्विवाद

एका झोपाळू
मुलाला
आईने दिली शिवी –
घुबडा घुबडा उठ
हीच ती ओवी

अपमान झाला म्हणून
घुबडाच्या झोपेला
लागली कात्री
तेव्हा पासून घुबड
झोपत नाही रात्री

संपर्क : ९४२१३४९१५९


# निरीक्षण

डॉ. पंडित विद्यासागर

विज्ञानाची सुरुवात कुतूहलातून कशी झाली हे आपण पाहिले. कुतूहलानंतर येते ते निरीक्षण. सामान्यपणे निरीक्षणाचा संबंध पाहण्याच्या क्रियेशी लावला जातो. निरीक्षणाची पोहच त्यापेक्षा अधिक आहे. निरीक्षण म्हणजे अनुभवातून होणारे आकलन. हे आकलन डोळ्यांच्या बरोबरच कान, नाक,जीभ,त्वचा या ज्ञानेंद्रियांच्या सहाय्याने होऊ शकते. त्याही पुढे जाऊन उपकरणांच्या वापरातूनही निरीक्षण करता येते. त्याचा विचार आपण नंतर करू. मानवी ज्ञानेंद्रियांद्वारे होणाऱ्या आकलनाचा विचार आपण प्रथम करू. हीच कल्पना आपण आता ओवीच्या स्वरूपात कशी मांडता येतो हे पाहू .



**कुतूहल जागृत राहिले । त्यास निरीक्षण जोडिले ।।**
**सारासार विचारे मग । केले विश्लेषण तयाचे ।।**
**विश्लेषणामाजी निष्कर्ष निघाला । तो पुनः पुनः पडताळीला ।।**
**निष्कर्ष तोच राहिला । तरच तो स्वीकारावा ।।**






आता ही संकल्पना समजण्यासाठी एक उदाहरण देता येईल. न्यूझीलंडमध्ये एका शेतकऱ्याच्या निदर्शनास आले की, त्याच्या शेतातील काही भागात येणारे पीक जोमदार असते, तर त्याच शेतातील दुसऱ्या भागात येणारे पीक कमकुवत असते. एकाच प्रकारची बियाणे, खते, खतांची मात्रा आणि पाणी सारख्या प्रमाणात देऊनही हा फरक दिसत होता. निरीक्षण केल्यानंतर त्याच्या ध्यानात आले की, ज्या भागात जोमदार पीक येते त्या भागात गांडूळ अधिक प्रमाणात आहेत. हे अनुमान त्याने निरीक्षणावरून काढले होते. या अगोदर असेच अनुमान ॲरिस्टॉटल आणि डार्विन या प्रसिद्ध शास्त्रज्ञांनी काढले होते. या अनुमानाला निष्कर्ष म्हणता येत नाही कारण, त्याला प्रयोगाचा आधार नाही.

मानवाने आगीचा शोध निरीक्षणाद्वारे लावला असे मानले जाते आणि असे मानणे योग्यच आहे. मानवाने जेव्हा घर्षणाने आग लागते हे पाहिले असेल त्या वेळी त्याचे कुतूहल जागृत होणे साहजिक होते . त्याच बरोबर कोणते पदार्थ चटकन पेट घेतात हेही त्याने निरीक्षणाने शोधले असणार . या आकलनाच्या आधारे त्याने अग्नी निर्माण करण्याची कला अवगत केली असणार. निरीक्षणाच्या आधारे लागलेल्या या शोधाचे खूप दूरगामी परिणाम झाले. आगीमुळे प्रकाश निर्माण झाला. त्याचा उपयोग करून रात्री वन्य पशूंपासून संरक्षण करणे शक्य झाले. त्याचप्रमाणे मानव रात्री काम करू लागला.

अलीकडच्या काळात निरीक्षणावरून लागलेला महत्त्वाचा शोध हा मधमाशीच्या भाषेशी संबंधित आहे. मधमाश्या पोळे तयार करून त्यात मध साठवतात. तेच त्यांचे घर असते. पोळ्यामध्ये अनेक मधमाश्या राहतात. त्यांना मध असणारी ठिकाणे शोधून मध गोळा करावा लागतो. 'फिरत असताना एखाद्या मधमाशीला खूप मध असणारे ठिकाण सापडले तर ती इतर मधमाश्यांना कसे अवगत करीत असेल?' असा प्रश्न ऑस्ट्रियन शास्त्रज्ञ कार्ल फ्रीच यांना पडला. ते मधमाश्यांसंबंधी संशोधन करीत होते. त्यांनी मधमाश्यांचे निरीक्षण सुरू केले. त्यांना असे दिसले की, काही मधमाश्या पोळ्याजवळ आल्यानंतर एक प्रकारचे नृत्य करतात. काही मात्र सरळ घरट्यात जातात. मधमाशीने नृत्य केल्यानंतर घरट्यातील काही माश्या उडून जातात. प्रत्येक वेळी त्यांची संख्या वेगळी असते. शिवाय त्या निरनिराळ्या दिशांना जातात. हे असे का होते ? याचा शोध त्यांनी घेतला. त्या वेळी नृत्याद्वारे मधमाशी इतर मधमाश्यांना मध असणाऱ्या ठिकाणाची, ते असणाऱ्या दिशेची, त्याच्या घरट्यापासून असणाऱ्या अंतराची आणि मध किती प्रमाणात आहे याची माहिती देते असे दिसून आले. किती मधमाश्या नृत्यात सामील होतात, किती वेगाने नृत्य करतात आणि नृत्य करताना सूर्याशी होणारा कोन किती असतो यातून ही माहिती दिली जाते. केवळ निरीक्षणावरून एवढा मोठा शोध लागणे ही एक दुर्मीळ गोष्ट आहे. या शोधासाठी कार्ल यांना १९७३ साली विज्ञान क्षेत्रातील अत्युच्च असे नोबेल पारितोषिक देण्यात आले.

निरीक्षणावरून निष्कर्ष निघाला तरी तो पुनः पुनः पडताळावा लागतो. निष्कर्ष तोच राहिला तरच स्वीकारला जातो. या पडताळणीसाठी आवश्यक असतो तो प्रयोग. विज्ञानात प्रयोगाला अनन्य साधारण महत्त्व आहे. प्रयोगाने सिद्ध झालेली बाबच विज्ञानात अंतिमतः स्वीकारली जाते. या प्रयोगाविषयी आपण जाणून घेऊया पुढील भागात.

**संपर्क : ९४२०४८३४८७**

# भूगोल गीत

चारुता शरद प्रभुदेसाई

भूगोलातील गमतीजमती
वेगवान वारे
दक्षिणायने उत्तरायणे
चंद्र, सूर्य, तारे!

पर्वत, सागर, नाले, धरणे
नद्या अन् पठारे
माती, शेती, रम्य जंगले
जाणून घ्या सारे !

विभिन्न भाषा, भिन्न देश ते
ओळख जगताची
भिन्न वेश अन् भिन्न संस्कृती
चव आहाराची !

कटिबंधाचे तापमान ते
वृत्तांचे जाळे
अक्षांशाचे रेखांशाचे
अंशस्थान कळे !

भरती आणि ओहोटीची
काय असे वेळ
शंख शिंपले वाळूमध्ये
चला मांडू खेळ !

धूमकेतू अन् ग्रहणे, उल्का
चमत्कार मोठा
पाऊस आणि ऊन थंडीचा
लपंडाव मोठा !

असा आमुचा भूगोल आहे
सुरस,रम्य छान
सखोल अभ्यासाने मिळवू
भौगोलिक ज्ञान !


संपर्क : ९९२२७५१८१९



मूळ कथा–क्रिस्टोफर सोमरविले
अनुवाद : माधुरी दीक्षित

# लाई आणि अमबम सेपिकला जाऊन कसे मिळाले

जोसेफ निमा नावाच्या आपल्या नातवाला आजोबा कियान कोमबुक यांनी एकदा ही गोष्ट सांगितली : उंच डोंगराळ भागामध्ये झुडपांमधल्या मोकळ्या जागेत, लाई आणि अमबम नावाची दोन छोटी तळी शेजारी शेजारी राहत होती. ऋतू जसे वेगवेगळे असतात ना तसे दोघांचे स्वभाव फार भिन्न होते. लाई पसरट आणि उथळ होता, उनाड होता, जेव्हा वारा वाहायचा तेव्हा त्याला खिदळायला, पाणी उडवायला आणि उड्या मारायला आवडायचं. जरासं निमित्त मिळालं की आपली जागा सोडून काठावरच्या उंदरांच्या बिळात घुसायला आणि सापांना झाडावर उंच पिटाळायला त्याला आवडायचं.



जंगलातले प्राणी पाणी प्यायला लाईकडं यायचे नाहीत, कारण जेव्हा ते पाण्यात तोंड बुडवायचे, तेव्हा तो उसळून त्यांच्या नाकातोंडात शिरायचा आणि त्यांना फुरफुरायला आणि शिंकायला भाग पाडायचा. म्हणून ते अमबमचं शांत, खोल पाणी संध्याकाळी पिणं पसंत करायचे. रात्री पिवळसर चंद्र ढगांधून सरकत दोन्ही तळ्यातली आपली प्रतिबिंब न्याहाळायचा – एक तुकड्यातुकड्यात विखुरलेलं तर दुसरं सपाट आणि स्थिर. तेव्हा लाई खुसफुसत जंगलातल्या सगळ्या वायफळ गप्पांमध्ये दंग असायचा, तर अमबम शांत असायचा.

एके दिवशी कंटाळून जाऊन लाईनं अमबमला हाक मारली, ''अरे ए गुळणी धरून बसलेल्या म्हाताऱ्या! माझ्या काठाची उंदरं गायब झाल्यापासून इथं काही मजा येईना झालीये. चल, बाहेर पडून जरा काही झाडांना धक्का मारून येऊ.''

अमबमच्या तोंडावर हास्याची एक लहर उमटली, पण तो गप्प राहिला.

''ए डबक्या! नुसता काय पडून राहतोस सदा न कदा? चल आपण खेळू.''

''जरा शांत बसून झाडातल्या पाखरांची किलबिल ऐकू की!'' अमबम म्हणाला.

''काहीही काय?'' अस्वस्थ लाईनं वैतागून गिरक्या घ्यायला सुरुवात केली. इतक्या की त्याचा एक भोवरा झाला आणि मग बोलण्यासाठी पाणी स्थिर होईपर्यंत त्याला वाट पाहावी लागली.

''चल आपण शर्यत लावू. सेपिक नदीपर्यंत पळत जाऊ आणि मग तिच्या पाठीवर स्वार होऊन समुद्रापर्यंत पुढे जाऊ.''

अमबमनं सेपिकचा वळणावळणाचा प्रवाह, त्यातले पांढरे फेसाळ धबधबे, माणसांच्या देवाची उंच छपरांची घरं, त्यांच्या अरुंद लांब बोटी यांच्याविषयी बरंच ऐकलं होतं.




''येतो मी तुझ्याबरोबर, पण शर्यत लावून पळायला नको. आपण झुडपांना वळसे घालत शांतपणं वाहत जाऊ. खालच्या दरीतले माणसांचे बगीचे आणि प्राण्यांची बिळे मोडायला नकोत.''

''ठीक आहे बाबा. तू म्हणतोस तसं.'' शेवटी आपल्या ताकदीच्या फुशारक्या मारायला लाईला अमबमशिवाय दुसरं कोण होतं, म्हणून तो तयार झाला आणि निघाला सुद्‌धा.

''अरे, थांब. इतकी घाई करू नको. आपल्याला रस्त्याचा विचार आधी नीट करायला हवा''.

''तुझं फारच असतं,'' असं म्हणत लाईनं आपला उसळणारा प्रवाह कसाबसा रोखला.

सगळ्यात कमी नुकसान करणारा रस्ता शोधण्यात अमबम गढून गेला. लाईला मात्र थोड्याफार उंदरांच्या बिळांची आणि बगिच्यांची ती काय पर्वा करायची, असं वाटत राहिलं. शेवटी नदी बनायला निघाल्यावर तेवढं होणारच की! त्याला राहवेना. त्यानं हळूच डोकं बाहेर काढलं तसं उतारावर थोडं पाणी घरंगळत निघालं. चंद्राचं फिकं चांदणं त्याचा हा नवा अवतार बघत होतं. विचारात गढलेल्या अमबमला मात्र काही दिसलं नाही. आपली सगळी ताकद लावून लाईनं एक मोठ्ठी लाट तयार केली आणि उताराकडं झेप घेतली. एखाद्या अक्राळविक्राळ ड्रॅगनसारखा तो वाटेत येणाऱ्या पहिल्या गावावर झेपावला. लाकडी पट्ट्यांची कुंपणं, झोपड्या, तोडून-मोडून डाव्या उजव्या बाजूंना फेकत तो निघाला. स्त्री-पुरुष, मुलं आरडाओरडा करत जीवाच्या आकांतानं सैरावैरा धावू लागले. डुकरं, कुत्री, उंदीर,

शहामृगासारखे न उडणारे पक्षी अचानक गळाभर पाण्यात वाहून जाऊ लागले. लाईच्या वाटेवरचं दुसरं, तिसरं गावही असंच उध्वस्त झालं. माणसांना घाबरून झाडावर चढताना पाहून, पायाला पाण्याचा स्पर्श होताच वेड्यासारखं धावताना पाहून लाई खदाखदा हसू लागला. मेहनत करून वाढवलेले बगीचे क्षणात नष्ट झाले. कुसकुस, केळी, भुईमूग, मका जंगलात दूर फेकले गेले. हे असतं दंगामस्तीचं खरं जीवन! लाईचा जन्म यासाठी होता.

जशी पहाट फुटली तशी लाईला खाली दूर डोंगराच्या पायाशी डौलदार वळण घेणारी सेपिक नदी दिसली. लाई झाडांत घुसला आणि धापा टाकत विसावला. ''भारी! काय धावलो मी! आता थांबून त्या वेड्या म्हाताऱ्याची वाट पाहतो.''

तिकडं बराच वेळ लाईच्या बाजूनं काही आवाज न ऐकू आल्याने अमबम म्हणाला, ''मला रस्ता सापडला रे. तुझं काय म्हणणं आहे?'' उत्तर आलं नाही. पण झाडावर बसलेला, सुरेख पिसं असणारा नंदनवनाचा पक्षी टिवटिवला, ''अरे जरा डोकावून बघ, लाई केव्हाच निघून गेलाय.'' लाईचा ठावठिकाणा शोधता शोधता अमबमला त्याने केलेला सगळा विध्वंस दिसू लागला. झालेल्या नुकसानानं दुःखीकष्टी होऊन लोकं काठाकाठानं गप्प उभी होती. पुरात वाहून गेलेल्या जनावरांचे मृतदेह गाळात फसून बसले होते. चिखलानं रडबडलेल्या वस्तूंमधून लहान मुलं आपली खेळणी शोधत होती. अमबम थबकला आणि लाई सेपिक नदीला भेटायला कुठं गेला असेल त्याचा अंदाज घेऊ लागला. त्याच जागी आपण आखलेल्या रस्त्यानं शांतपणं वाहत जाता येईल, अशी खात्री वाटल्यावर त्यानं, दुःखी मनानं आणि गप्प राहून पुढचा मार्ग धरला. वाटेत आलेल्या एखाद्या घराला किंवा बागेला वाचवण्यासाठी त्याला वळसे पडले, कधी तिप्पट अंतर पार करावं लागलं तरी त्यानं आपला मार्ग सोडला नाही.

लवकरच एखाद्या चंदेरी सापासारखा जंगलाच्या झाडांतून बाहेर पडणारा लाई त्याला दिसला. ''काय हळूबाई? कुठे होतात इतका वेळ?''

''तुझ्यापेक्षा जरा काळजीपूर्वक धावत होतो मी. मध्यरात्री निघून; असा गोंधळ माजवून काय मिळवलंस तू?''

पण लाईच्या कानात कुठे हे शब्द शिरत होते? ''अरे, काय मज्जा आली माहितीये? असा सुसाट बाणासारखा धावलो मी, थेट इथपर्यंत. शेवटी तुझ्यासाठी वाट पाहत थांबलो. जळतोय ना माझ्यावर तू?''

आता मात्र अमबमचा संयम संपला, ''स्वतःची मजा सोडून दुसरं काही दिसतं का रे तुला?''

दोघांची धक्काबुक्की सुरू झाली. अमबमनं लाईचं डोकं पकडलं आणि दोघे धम्मदिशी सेपिकच्या पाण्यात कोसळले. सेपिकनं आपल्या मोठ्ठ्या प्रवाहात त्यांना गुंडाळलं आणि समुद्राकडं धावत निघाली. तुम्ही आजही डोंगरउतारावरून सरळ खाली झेपावणारा लाईचा प्रवाह आणि काळजीपूर्वक वळसे घालत डोंगर उतरणारा अमबमचा प्रवाह पाहू शकता. ते आजही सेपिकमध्ये उडी मारण्याआधी धक्काबुक्की करतात. पण तिथं राहणारे लोक त्यांची गोष्ट विसरले नाहीत. अमबम त्रास देत नाही, पण लाई आजही कधीकधी उसळून, काठ सोडून वाहतो. मग लोक मागची वाताहत सावरता सावरता म्हणतात, या लाईसारख्या काही गोष्टी कधीच बदलत नाहीत. आग लागो मेल्या तुला!

**(साऊथ सी स्टोरीज: टेल्स फ्रॉम पापुआ न्यू गीनिआ (१९८५) South Sea stories : tales from Papua New Guinea-1985 या क्रिस्टोफर सोमरविले (Christopher Somerville) यांच्या पुस्तकातील, 'हाऊ लाई एन्ड अमबम जौइंड द सेपिक' या गोष्टीचे साभार स्वैर भाषांतर)**

**संपर्क : ९४२३५८६३४८**




# खरं माकड कोण?

डॉ. शिरीष भावे

निबीड जंगलात झाडावरी
झोपलं होतं
दुपारी शांत
माकडाचं एक पिल्लू उनाड
इतक्यात झाला आवाज ठक्क
दचकून झालं जागं टक्क
पायवाटेवर पडलं होतं चौकोनी काहीतरी
उन्हाची तिरीप चमकली त्याच्या काचेवरी
काय पडलंय बघायला
खायचं आहे का शोधायला
उडी मारून आलं
खाली रस्त्यावरी
थकलेला पांथस्थ जात होता तिथून
जाता जाता निसटला फोन ओल्या हातातून
पिल्लाने उचलला फोन अन् गेलं वर चढून
'आई, बघ काय नवीन खेळणं सापडलं मला चुकून'
आई म्हणाली, 'टाकून दे ते खेळणं बाळा,
माणसं फोन म्हणतात त्याला, लागेल नसता चाळा'
खोडकर, खेळकर, द्वाड माकडाचं ते पिल्लू
लपवून ठेवला कुठेतरी
आईला बनवलं उल्लू
अचानक त्यातून आला आवाज कसला तरी ट्रिंग ट्रिंग
घाबरून ठेवून दिला खाली
ही भलतीच काही तरी रिंगरिंग
मग एकदा पुन्हा
आवाज तसाच आला
आता मात्र हातात घेऊन न्याहाळत बसला
कुठेतरी चुकून बोट
लागलं त्याचं नकळत
त्यातून आवाज आला 'हॅलो' काहीपण नव्हतं कळत
पिल्लाला कळले याच्यावर लागलं बोट कुठेतरी
की यातून होते लगेच जादू गमतीदार काहीतरी
पुन्हा एकदा घेऊन गेला आईकडे यंत्र

ती म्हणाली ‘करू नको नाद, घातक त्याचं तंत्र’
माकडाचे पिल्लू ते
ऐकतंय कुठे काही
फांदीवर हातात फोन
‘कोणी बघत तर नाही’
मग त्यानी सटासट
दाबले त्याचे ॲप
इकडेतिकडे बटणं दाबून
वाट्टेल तिथे केलं टॅप
इकडे त्या माणसाची
उडाली सपशेल भंबेरी
हरवला कुठे फोन माझा
काल उन्हात दुपारी
माकडा हाती सुरू झाले वाकडेतिकडे व्यवहार
क्षणात बँक रिकामी
सगळीच बाब बेनामी
अधूनमधून मजेमध्ये बघत बसलं व्हिडिओ
कधी कधी गाणी ऐकण्या लावून बसला रेडिओ
फोनमध्ये रमलं पिल्लू
कशात लक्ष नाही
खाणं पिणं नाही नि झोपही नाही
आई व्याकुळ झाडावर
चित्त नाही ताळ्यावर
बाळ माझं कुठे सापडत कसं नाही
उंच एका फांदीवर पिल्लू दिसलं तिला
कान पकडून खाली आणलं धपाटा दिला
‘देऊन टाक त्याचा त्याला, सांगितलं ना तुला’
शोधत आला वाटसरू पडला फोन कुठे
माकडा हाती फोन पाहून जोडले हात तिथे
‘दे मला फोन माझा, तुझं काही नाही त्यात
माझं मन त्याच्यात रुतलंय खोलवर आत’
त्या क्षणी पिल्लाने फोन फेकला त्याच्याकडे
‘मला नको तुझी ही अफूची गोळी
याच्यामुळे गेली मजा जगण्याची सगळी
घरातल्यांशी गप्पागोष्टी नाही संध्याकाळी
उड्या मारणं, फळ खाणं विसरून गेलो सगळं
आभासी हे जग तुझं, खऱ्याहून वेगळं
चुकून सुद्धा पुन्हा कधी येऊ नकोस इकडे
गुलाम त्याचे, तुम्ही माणसं हीच खरी माकडे’

**संपर्क :** ९८२२०३५६३७



# निसर्गाची हाक

संगीता केंजळे



पहाटे पहाटे थंड वाऱ्याची झुळूक आली. वडाच्या झाडाची पाने थरथरली, आणि वडाला हळूच जाग आली. त्याने हिरव्या पानांचे डोळे किलकिले करून पाहिले. आजूबाजूची झाडेही हळूहळू जागी होत होती. कोणी आळस देत होती. वडाच्या भोवताली चिक्कू, आंबा, पेरू, कडूनिंब, बोरी, बाभळी अशी अनेक प्रकारची झाडे होती. झाडांवर चिमणी, मैना, बुलबुल, सुगरण, कावळा, साळुंखी असे अनेक पक्षी राहात होते, निरनिराळ्या घरट्यांमधून पक्षी चोची बाहेर काढून डोकावत होते. सकाळ कधी होतेय याची ते वाट बघत होते. पहाटेच्या शांततेत त्यांची चिव चिव, टिव टिव चालू होती. बुलबुल एका तालासुरात शीळ वाजवल्यासारखे लांब ताण मारत गात होता, पक्ष्यांची (सुरेल) गाणी वातावरणात प्रसन्नता आणत होती. हळूहळू सूर्यकिरणांचं आगमन झालं. आकाशात लाल सोनेरी रंग उधळले गेले होते.

आर्य आणि शौर्य दोघांना शाळेला आज सुट्टी होती. दोघांनी सकाळी लवकर उठून टेकडीकडे फिरायला जायचे ठरवले होते. ठरल्याप्रमाणे दोघे चालत चालत त्या मोठ्या वडाच्या झाडाजवळ आले. पाऊलवाटेने चालताना गवताची पाती पायांना स्पर्श करत होती. गवतावर पडलेले दवबिंदू, पहाटेचे धुके, पक्ष्यांची किलबिल वातावरण खूप छान वाटत होते. पक्ष्यांचे आवाज ऐकून ते दोघे वडाच्या झाडाखाली थांबले, इतक्यात त्यांना

कुजबुजण्याचा आवाज आला. आर्य म्हणाला, ''ए शौर्य, ह्या झाडांवर बघ कित्ती पक्षी आहेत. आणि ते काहीतरी बोलत आहेत, आपण ऐकू या का?'' शौर्य म्हणाला, ''हो हो, थांबू या आपण इथे थोडा वेळ, ऐकू या ते पक्षी काय बोलताहेत ते.'' दोघांनी आपल्याकडील दुर्बिणी डोळ्यांवर लावल्या आणि ते वर झाडाकडे पाहू लागले.

इतक्यात भुर्रकन उडत एक चिमणी काकू वडाच्या झाडावर येऊन बसली. आपआपल्या घरट्यांतून डोकी बाहेर काढून सगळे पक्षी कुतूहलाने त्या चिमणीकाकूकडे पाहू लागले. ''अरे! ही कोण नवी पाहुणी आली बरे! चिव, चिव, चिव, चिव,'' जो तो विचारू लागला. इतक्यात शेजारच्या बाभळीच्या झाडावर असलेल्या घरट्यातून एक सुगरणआजी उडून चिमणीकाकूजवळ आली आणि म्हणाली, ''अगं, तू तर त्या शाळेमागच्या झाडांत राहतेस ना? मग आज इकडे कशी काय?'' चिमणीकाकू डोक्याला पंख लावत म्हणाली, ''अगं, काय सांगू बाई, शाळेच्या मागे आत्ता मोठ्ठा मॉल होणार आहे म्हणे! कालच तिथे मोठी यंत्र घेऊन काही माणसे आली होती. एका जेसिबीने आमची झाडं पाडली, आमची घरटी मोडून टाकली बघ. त्यात माझंही घरटं तुटलं. आम्ही पक्ष्यांनी चिवचिवाट केला, पिल्लांनी टाहो फोडला. पण ह्या माणसांना दया माया नाही बघ!'' सुगरण आजी म्हणाली, ''अरे रे! वाईट झाले. पण तुझ्या पिल्लांचं काय झालं? कुठे आहेत ती?''

चिमणी काकू म्हणाली, ''सुदैवाने ती गवतावर पडली, म्हणून वाचली बघ! आता त्यांना एका मोठ्या दगडाच्या आडोशाला ठेवून आले, इथे घर बघायला.'' सुगरण आजी म्हणाली, ''हो, तू इथंच माझ्या घराजवळ घरटं बनव आणि राहा इथे...'' चिमणी काकू म्हणाजी, ''हो, मी आजच इथे घर बनवते आणि माझ्या पिल्लांनाही इथे घेऊन येते. पण इथे जवळ पाणी आहे का गं?'' सुगरण आजी म्हणाली, ''अगं काय सांगू तुला? ह्या झाडांच्या पाठीमागून एक मोठा पाण्याचा ओढा वाहत होता, निळंशार पाणी, कसं झुळझुळ वाहायचं. सारे पशुपक्षी येऊन या थंडगार पाण्याने आपली तहान भागवायचे, झाडांचीही तहान भागवायची. मग झाडं खूश होऊन हवेत आणखी गारवा पसरवायची.'' चिमणी काकूने विचारले, ''मग आता कुठे गेला तो ओढा? काय झालं त्याचं?'' सुगरण आजी म्हणाजी, ''अगं, माणसांनी इमारती बांधताना त्या ओढ्याच्या जागी मोठा पाईप टाकून ओढा बुजवून टाकला. त्यामुळे काठावरची बरीच झाडं झुडपं मरून गेली. आता आम्हांला पाण्यासाठी दूरवर भटकावे लागते. आपले काही भाईबांधव तर इथे चारा पाणी मिळेना म्हणून दूर डोंगराकडे निघून गेले बघ!'' चिमणी काकूने आपला पंख कपाळाला लावला व म्हणाली, ''काय हे दिवस आले?'' दोघींच्या गप्पा चालू होत्या. इतक्यात सुगरणीच्या घरट्यातून पिल्लांचा चिवचिवाट ऐकू येऊ लागला, तशी सुगरण आजी वळून म्हणाजी, ''ए पोरट्यांनो दंगा करू नका रे! आत्ता तुमचे आई बाबा तुमच्यासाठी खाऊ घेऊन येतील. गप्प बसा.'' इतक्यात तिथे एक हिरवा मिंटू पोपट फांदीवर येऊन बसला. सुगरण आजीने विचारले, ''मिंटू, तुला काय हवे आहे रे?'' मिंटू पोपट म्हणाला, ''आजी मला खूप तहान लागली आहे, त्या टेकडीजवळ एक झरा होता पण तोही आटला आहे. किती ऊन आहे. सूर्य नुसती आग ओकतोय.''

सुगरण आजी म्हणाली, ''हो रे खरं आहे तुझं? तहान भुकेनं जीव व्याकूळ होतोय अगदी, ही माणसं झाडं, जंगलं तोडून, ओढे-नाले बुजवून आपलं अन्नपाणी का हिरावून घेतात बरे? पण तू निराश होऊ नकोस!'' चिमणी काकू म्हणाली, ''अरे त्या टेकडीच्या पायथ्याशी पहा, एवढ्या कडक उन्हातही, पांगिरा, काटसावर या झाडांना फुलांचा बहर आला आहे बरे!''

आतापर्यंत यांचं संभाषण काळ्या भुऱ्या रंगाचा वटवट्या ऐकत होता, तो भुर्रकन उडून खालच्या फांदीवर येऊन बसला. आपली बोटाएवढी शेवटी वरखाली हलवत ट्वि ट्वि करत म्हणाला, ''मला नाही आवडत ही काटेरी झाडे, त्यांना धड खूप पानही नसतात. ती सावलीही देत नाहीत. त्या शेजारच्या बागेत किती छान छान रंगीत फुलं येणारी झाड लावली आहेत. ती मला खूप आवडतात.''

सुगरण आजी म्हणाजी,''अरे वटवट्या, उन्हाळ्यात या काटेरी झाडांवर लाल, पिवळी, केशरी अशा रंगांची फुलं फुलतात. त्या फुलांच्या पाकळ्या खूप जाड असतात, त्यात भरपूर अन्न व पाणी साठवलेले असते. तीच तर या ओसाड माळरानातील पक्ष्यांची भूक आणि तहान भागवतात ना आणि तू म्हणतोयस त्या बागेतील झाडे पण ती विलायती आहेत. अशा झाडांवर पक्ष्यांना घरटी बांधता येत नाहीत. मग त्यांच्या काय उपयोग. तेच काटेसावर, पांगिरा, बाभूळ, बोर, जांभूळ ही झाडे कमी

पाण्यावरही टिकून राहतात आणि उन्हाळ्यात यांच्या फुलाफळांना बहर येतो. ती फुले फळे आपली तहान भूक भागवू शकतात.''

मिंटू पोपट म्हणाला, ''अरे खरंच की, मी आत्ता जाऊन ती फुले खातो म्हणजे माझी तहान भागेल. खरंच हा निसर्ग आपल्या सर्वांना किती भरभरून देत असतो.''

चिमणी काकू म्हणाली, ''हो अगदी खरचं आहे तुझं!, झाडांवर कुऱ्हाड चालविणाऱ्या माणसांनाही निसर्ग छाया देतो, मधुर फळे देतो, ऑक्सिजन देतो, औषधी पाने, फुले देतो. शिवाय निसर्ग कुणाकडून काहीही अपेक्षा न ठेवता देतो आणि ही झाडंच नष्ट झाली, तर आपण राहणार कुठं, खाणार काय, श्वास कसा घेणार? निसर्गाशिवाय सगळ्यांना जगणं मुश्कील होईल? म्हणून निसर्गाचं संवर्धन करायला हवे.''

सुगरण आजी म्हणाली, ''हो गं, खरं आहे तुझं, ही निसर्गाची हाक आहे, आपण ती ऐकायला हवी, त्याला वाचवण्यासाठी आपण प्रयत्न करायलाच हवेत.'' मिंटू पोपट म्हणाला, ''हो गं आजी, तू बोलतेस ते बरोबर आहे, पण या माणसांना हे सगळं सांगणार कोण?''

चिमणी काकू म्हणाली, ''जाऊ द्या झालं! आता दिवस बराच वर आलाय, चला आपण जाऊ या चारा पाणी शोधायला.'' असे म्हणत पक्षी इकडेतिकडे उडू लागले, इतका वेळ झाडाखाली पक्ष्यांचा संवाद ऐकत थांबलेल्या आर्य आणि शौर्यने 'हं!' असं म्हणत दीर्घ श्वास सोडला. शौर्य म्हणाला, ''ही आहे तर निसर्गाची हाक!'' आर्य म्हणाला, ''शौर्य, आठच दिवसांनी माझा वाढदिवस आहे. मी तर पक्कं ठरवलंय, मी प्रत्येक वाढदिवसाला पाच तरी झाडं लावणारं, आणि आपल्या मित्रांनाही छोटी रोपे भेट म्हणून देणार.'' शौर्य म्हणाला, ''वा! झकास आयडिया, मीपण माझ्या वाढदिवसाला असंच करेन आणि आपल्या मित्रांनाही आपण हीच आयडिया देऊ. मग आपल्या बाजूबाजूला झाडंच झाडं येतील, सगळा निसर्ग बहरलेला असेल. आणि त्यांवर खूप सारे पक्षी आनंदाने राहतील. गाणे गातील, खेळतील, बागडतील, त्यावर रंगीबेरंगी फुलपाखरं भिरभिरतील.'' असे म्हणून शौर्य व आर्य डोळ्यांत निसर्गाचं हिरवं स्वप्न घेऊन घराकडे चालू लागले.

**संपर्क : ९४०४६६७९३०**


**प्रेस रजिस्ट्रेशन ऑफ बुक्स ॲक्ट अधिनियम – ११ बी अन्वये प्रसिद्ध करावयाची माहिती फॉर्म क्र. ४ (नियम– ८ पहा)**


| | | |
|---|---|---|
| **प्रकाशन स्थळ** | : | महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ, 'बालभारती' सेनापती बापट मार्ग, पुणे ४११ ००४. |
| **प्रसिद्धीचा नियतकाल** | : | दरमहा |
| **मुद्रकाचे व प्रकाशकाचे नाव** | : | श्री. विवेक उत्तम गोसावी |
| **राष्ट्रीयत्व व पत्ता** | : | भारतीय<br>महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती मंडळ, रवींद्र नाट्यमंदिर, पु.ल. देशपांडे कला अकादमी, सयानी रोड, प्रभादेवी, मुंबई ४०० ०२५. |
| **संपादकाचे नाव** | : | श्री. कृष्णकुमार पाटील |
| **राष्ट्रीयत्व व पत्ता** | : | भारतीय<br>महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ, 'बालभारती' सेनापती बापट मार्ग, पुणे ४११ ००४. |
| **मासिकाची मालकी** | : | महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ, 'बालभारती', पुणे. |


मी विवेक उत्तम गोसावी जाहीर करतो, की वर दिलेली माहिती माझ्या माहितीप्रमाणे संपूर्णतः खरी आहे.


१ मार्च २०२४ — **विवेक उत्तम गोसावी**
मुंबई – ४०० ०२५. — प्रकाशक


## इ. ८ वी ते १२ वीच्या विद्यार्थ्यांसाठी 'बालभारतीच्या' दर्जेदार व गुणवत्तापूर्ण स्वाध्यायपुस्तिका




### ठळक वैशिष्ट्ये

- प्रचलित पाठ्यपुस्तकावर आधारित
- स्वयं अध्ययनास चालना देणारी
- लेखनाचा आधिकाधिक सराव
- प्रश्नप्रकारांमध्ये वैविध्य
- विषयांचे दृढीकरण
- जिज्ञासावर्धक आणि विचारप्रवर्तक प्रश्न
- पाठ्यांशावर आधारित परंतु पाठ्यपुस्तकापलीकडील ज्ञानाच्या वाढीला चालना देणारे प्रश्न
- महाराष्ट्रातील शिक्षण तज्ज्ञ व अनुभवी शिक्षकांचा लेखन सहभाग
- अल्प किंमतीत दर्जेदार व गुणवत्तापूर्ण अभ्यास साहित्य
























**नोंदणीकृत विक्रेते व शैक्षणिक संस्थांना २०% सवलत**

**वरील स्वाध्याय पुस्तके खरेदीकरिता मंडळाच्या खालील विभागीय भांडार व्यवस्थापकांशी संपर्क करावा**

विभागीय भांडारे: पुणे-९४२३००५०७०, मुंबई (गोरेगाव)- ९४२३००५०७१, छत्रपती संभाजीनगर- ९४२३००५०७३, नागपूर- ९४२३००५०७२, नाशिक-९४२३००५०७४, लातूर- ९४२३००५०७५, कोल्हापूर- ८७९९९०९६५६, अमरावती ९४२३००५०७७, पनवेल- ९४२३००५०७८

# ट्रेनटायगर्स आणि टायर क्रॉक

मालविका देखणे

शीर्षक वाचून गोंधळायला झाले ना? पण हीच ह्या प्राण्यांची नावे आहेत. एखादा प्राणी कितीही बलवान असला तरी मानवाच्या चुकीचे परिणाम त्याला कसे हतबल करतात आणि एखादा माणूसच त्यांची कशी सुटका करतो याच्या ह्या दोन हृदयस्पर्शी कथा.

मुलांनो, प्राणी आणि त्यांचे हाल, याबद्दल भरपूर लिहिले जाते. पण अशाही घटना घडत असतात की ज्या वाचल्यावर हृदय हेलावते आणि 'माणसा, माणसा, कधी रे होशील माणूस?' असा प्रश्न पडतो. वनस्पती, प्राणी, पक्षी, माणूस सगळी निसर्गाची लेकरे असे म्हटले तरी कधी कधी माणसाच्या हातून अशा चुका होतात ज्यामुळे प्राणी जबर शिक्षा भोगतात. प्राण्यांना दगड-गोटे मारणे, त्रास देणे, गिल्लोरने मारणे, जाळ्यात पकडणे अशा कृतींमुळे कितीतरी प्राणी हकनाक जीव गमावतात. पण आज मी वेगळ्याच दोन गोष्टी सांगणार आहे. वाघ, मगर यांसारखे बलाढ्य प्राणीही माणसाच्या चुकीमुळे कसे हतबल होतात याच्या अगदी १००% खऱ्या गोष्टी सांगणार आहे.

देश अर्जेन्टिना, गाव सान लुई (San Louis) येथे एका शेतकऱ्याच्या शेतात एका आगगाडीच्या डब्यात ४ वाघ सुमारे १५ वर्षे राहत होते असे सांगितल्यास तुमचा विश्वास बसणार नाही. पण हे पूर्णपणे सत्य आहे. आणि म्हणूनच त्यांचे नाव ट्रेन-टायगर्स असे पडले. २००७ सालाची गोष्ट. अर्जेन्टिनात असलेली एक फिरती सर्कस दुसऱ्या गावी जात होती. मालकाने एका स्थानिक शेतकऱ्याला एक अनोखी विनंती केली. माझ्याकडे दोन लहान वाघ आहेत. सध्या मला त्यांना नेणे शक्य नाही. तू काही दिवस सांभाळलेस तर उपकार होतील. मी



लवकर परत येईन. प्रश्न काही दिवसांचा होता. मालक पैसे देणार होता. शेतकरी दयाळू होता. तो तयार झाला. झालं! वाघ असलेला आगगाडीचा डबा शेतावर आणला गेला. ते सुमारे ३ आणि १ वर्षांचे वाघ होते. काही दिवस मजेत गेले. मालक आला नाही. शेतकरी माणुसकीच्या भावनेने त्यांना खायला घालत राहिला. होता होता दिवस गेले, महिने गेले, वर्षे गेली पण मालक आला नाही. तो येणार नाही हे बहुधा त्याला उमगले. शेतकरी हवालदिल झाला. त्याच्या जवळचे पैसे केव्हाच संपले होते. वाघ मोठे होत होते. वाघ होते Royal Bengal Tiger प्रजातीचे. हळूहळू त्यांना खाणे देणे त्याच्या आवाक्याबाहेर गेले. पण करतो काय! माणुसकी वाघांना उपाशी मारू देईना आणि कायद्याचे भय कोणाची मदत मागू देईना. तोंड दाबून बुक्क्यांचा मार अशी गत झाली. अर्जेन्टिनात वन्य प्राणी बाळगणे कायद्याने गुन्हा आहे. शेतकरी घाबरून गप्प राहिला. आपल्या ऐपतीप्रमाणे वाघांचे करत राहिला. (ह्या गडबडीत १-२-३ नाहीतर तब्बल १३-१४ वर्षे गेली.) शेतकरी काळजीत होता. वाघांचेही हाल होत होतेच. दरम्यान वाघ मोठे झाले. एक होता वाघ, एक वाघीण. मग काय, त्यांना दोन पिल्ले झाली! आगगाडीचा डबा. त्याचे क्षेत्रफळ ७५ वर्ग मीटर. ह्यात आता ४ वाघ राहू लागले! डबा लोखंडी सळ्यांचा होता. त्यामुळे ऊन, वारा, पाऊस, थंडी कशापासूनही संरक्षण नव्हते. नाही म्हणायला एका बाजूला लहानशी खोली (नाईट शेल्टर) होती. त्यात बसता येत असे. बाकी पिंजरा खाली-वर असा द्विस्तर (Duplex) प्रकारचा होता. आजूबाजूला हिरवळ असली तरी बाहेर पडता येत नव्हते. त्यातील नवीन वाघांनी तर जमिनीवर पायही ठेवला नव्हता. पावसामुळे पिंजरा धुतला जाई तेवढाच. नाहीतर सगळे विधी पिंजऱ्यातच! ह्यातही वाघांनी वरच्या मजल्यावर घाण करण्याचा नियम केला होता. तो भाग मात्र अत्यंत घाण होता. पिंजरा किती घाण झाला असेल ह्याची कल्पनाच केलेली बरी. ह्या काळात बिचारे वाघ पिंजऱ्यात येरझारा घालत असत. तीच आणि तेवढीच हालचाल. निसर्गाची कृपा एवढीच की वाघ आजारी झाले नाहीत. झाले असतीलही, तरी स्वत:च बरे झाले.

अखेर शेतकऱ्याचा धीर सुटला. १२-१३ वर्षांनंतर त्याने स्थानिक संस्थेला सगळी राम कहाणी सांगितली. पण त्याची पुष्टी देणारा पुरावा काहीही नव्हता. ह्या चौकशीत काही दिवस गेले. फरक एवढाच झाला की वाघांचा पिंजरा थोडा-फार साफ होऊ लागला. त्यांना नियमित जेवण मिळू लागले. पण हे काही कायमस्वरूपी उत्तर नव्हते. अखेर स्थानिक संस्थेने Natasja de Winter ह्या प्राणी हक्क संरक्षकाला साकडे घातले. तिने एक महत्त्वाचे काम केले. तिने Four Paws ह्या संस्थेशी संपर्क साधला. ही सेवाभावी संस्था अडचणीत असलेल्या जगभरातील मोठ्या चतुष्पाद प्राण्यांचे कायम-स्वरूपी पुनर्वसन करते. संस्थेचे सगळे पदाधिकारी ह्या कामाला भिडले. त्यांच्या चमूने ह्या प्रश्नाचा अभ्यास केला. वाघांचीही तपासणी झाली. यातील मूळ दोन वाघ आता १८ आणि १५ वर्षांचे नक्कीच होते. लहान वाघ १० आणि ५ वर्षांचे. त्यांना सोडवायची इच्छा तर होतीच पण मार्ग जरा खडतर. चार जीव आणि अडचणी अनेक. वाघ म्हणजे काही उंदीर नव्हे की पिंजऱ्यात टाकले आणि सोबत नेले. पुन्हा सतरा परवाने घेणे आले आणि अंतरही तब्बल वीस हजार किलोमीटर! आणि यासाठी लागणारा पैसा! येथे जनतेने सढळ हातांनी मदत केली. सगळेच खासम-खास, अफलातून. पुनर्वसनासाठी लागणाऱ्या सर्व बाबींची पूर्तता झाली. वाघांची मानसिक तयारीही गरजेची होती. Four Paws च्या चमूने तब्बल ७० तासांच्या प्रवासासाठी लागणारी मानसिक तयारी करण्याच्या दृष्टीने त्यांच्याशी (पिंजऱ्याबाहेरूनच) मैत्री केली. त्यांच्यासाठी खास पिंजरे तयार करण्यात आले. वाघ देशाबाहेर जाणार हे नक्की झाले. स्थानिक जनतेची एकच इच्छा होती. वाघांचे नामकरण व्हावे, तेही अर्जेन्टिनाशी संबंधित नावांनी! तीही इच्छा पूर्ण केली. वाघांचे नामकरण झाले. वडील सॅन्ड्रो (Sandro) वय १८ वर्षे, आई मॅफाल्डा (Mafalda) वय १५ वर्षे, दोन मुले गुस्ताव (Gustavo) वय १२ वर्षे आणि मेस्सी (Messi) वय १० वर्षे. मेस्सी हे नाव सुप्रसिद्ध खेळाडू Lionel Messi यावरून ठेवले बरं! आणि तो सुदिन उजाडला. वाघांची कोव्हिड चाचणी झाली. ती निगेटिव्ह आल्यावर प्रवासाचा मार्ग मोकळा झाला. ९ मार्च २०२२ रोजी प्रत्येकाला वेगळ्या खास पिंजऱ्यात



सोडण्यात आले. हे पिंजरे खूप मोठ्या ट्रेलरवर चढवण्यात आले. त्यानंतर सुमारे १० तासांच्या प्रवासानंतर ब्युनोस आयर्स (Buenos ires) विमानतळावर वाघांची स्वारी पोहोचली. पिंजरे विमानात ठेवले गेले. आणि विमानाने उड्डाण केले. प्रवास लांबचा होता. ठरावीक वेळेनंतर वाघांचे हालहवाल तपासले जात होते. वाघांनी पण सहकार्य केले. जोहान्सबर्ग (Johannesburg) विमानतळावर विमान उतरले. अखेर ताफा दक्षिण आफ्रिकेतील बेथलेहेम शहरातील संघटनेच्या LIONSROCK Big cat या अभयारण्यात पोहोचला. वाघांसाठी तात्पुरत्या स्वरूपाचे कुंपण (enclosure) तयार केले होते. (त्यात ते रुळले की मग त्यांना कायम स्वरूपाच्या १२ वर्ग किलोमीटरच्या जागेत सोडले जाणार होते. चारही वाघ हळूहळू बाहेर पडले. मातीचा स्पर्श त्यांनी पहिल्यांदाच अनुभवला. सुटकेचा श्वास म्हणतात तो हाच असणार! ही सुटका Chinese Year of the Tiger मध्येच झाली हा एक योगायोगच आहे. आज हे चार वाघ मजेत आहेत. त्यांचे खाणे-पिणे, बागडणे सुरू आहे. वय पाहू जाता सॅन्ड्रो (Sandro) ची खास काळजी घेतली जात आहे. त्याची दृष्टी अधू झाली आहे. ह्या चारही वाघांचे उर्वरित आयुष्य येथे आनंदात जाईल यात शंका नाही. सर्कस आणि प्राणी संग्रहातील प्राण्यांची अवस्था खूपदा वाईट असते. हल्ली दुर्मीळ तसेच विलायती (Exotic) प्राणी आणि पक्षी पाळण्याची फॅशन आली आहे. ते बेकायदेशीर आहे हे आपल्याला माहीत नसते. कधीकधी अशा प्राण्यांना सांभाळणे जमत नाही आणि त्यांना सोडून दिले जाते. कितीतरी प्राणी तस्करी होताना मरतात. याबद्दल तुम्ही नक्की विचार करा.

दुसरी गोष्ट इंडोनेशियातील आहे. तेथील भाषेत Buaya kalung ban ह्या नावाचा अर्थ आहे-टायरचा कंठहार घातलेली मगर. आता हे काय? असा प्रश्न तुमच्या मनात आला असेल. मगर गळ्यात टायर का घालेल? पण हेही सत्य आहे. आणि याला कारण आपणच आहोत. 'गरज सरो वस्तू फेको' ही आपली आवडती सवय आहे. मग ती वस्तू स्टेपलरची पीन असो की पाण्याची रिकामी बाटली, झाकण की मोटारसायकलचे जुने टायर. आणि मग टायर एखाद्या मगरीच्या गळ्यातील कंठहार बनतो. कंठहार कसला, जीवघेणा फासच की! असेच एक टायर एका मगरीच्या गळ्यात अडकला. काही दिवस नाही तर तब्बल ६ वर्षे! त्याचीच ही गोष्ट, काहीशी सुरस, काहीशी मन हेलावून टाकणारी, माणसाच्या प्रयत्नांचे कौतुक करणारी. तर गोष्ट इंडोनेशिया देशातील. सुलावेसी (Sulawesi) बेटावरील पालू (Palu) गाव. २०१६ मध्ये तेथील नदीत एक मगर दिसू लागली. तशा तेथे २० मगरी होत्या पण ह्या मगरीच्या मानेत टायर अडकला होता! ही मगर गावकऱ्यांच्या कुतूहलाचा, नंतर दयेचा आणि नंतर काळजीचा विषय बनली. वर्षे गेली तशी मगर मोठी झाली तब्बल १३-१४ फुट! ती अंगाने भरली. आणि तिच्या गळ्यातला टायर गळा आवळू लागला! टायर सडून गळून पडण्याचा प्रश्न नव्हता. तो शेकडो वर्षे तसाच राहतो. आता मात्र टायरमुळे मगरीचा गळा आवळून मरण्याचा धोका होता. तिच्या सुटकेसाठी प्रयत्न करणे गरजेचे झाले. स्थानिक संस्था BKSD Central Sulawesi ने यासाठी बक्षीसपण ठेवले. लोकांनी प्रयत्न केले. पण

यश येत नव्हते. अखेर २०२०मध्ये ऑस्ट्रेलियाचा क्रॉक-मॅन मॅट राइट (Matt Wright) आणि त्याचा गट सुलावेसीला आला. त्यांनी भरपूर प्रयत्न केले. पण परवानग्या आणि खास पिंजरे बनवण्यात बराच वेळ गेला. मॅट काम करू लागला की लोक गर्दी करत. त्याचाही परिणाम म्हणून मगर पिंजऱ्यात येईना.

आता एक प्रश्न असा होता की, ही मगर आली कोठून? मॅटने शोध घेतला तेव्हा त्याला कळले की ही मगर एका मगर पैदास केंद्रा (Crocodile Farm) मधील होती. आर्थिक संकटात पडलेल्या केंद्राने तेथील मगरी नदीत सोडून दिल्या होत्या. मगरींना खायला घालणाऱ्या जमाल नावाच्या माणसाने ही माहिती पुरवली. 'ह्या मगरीचे नाव आचो (Acho) आहे, ती माझ्या हाकेला ओ देते,' असेही त्याने सांगितले. हा जमाल मगरीला पकडण्यासाठी मदत करू लागला. दुसरा प्रश्न असा की ह्या मगरीच्या गळ्यात टायर आला कसा? ह्यासाठी दोन शक्यता सांगण्यात आल्या. कोणीतरी टायर निष्काळजीपणे नदीत फेकला आणि तो उभा पडला असावा. गढूळ पाण्यात अन्न शोधणारी मगर त्यातून पलीकडे गेली. टायर गळ्यात अडकला. तिला तो बाहेर काढता येईना. पण तेव्हा ती लहान असल्याने फारसा त्रास होत नसावा. किंवा मगर पकडण्याच्या प्रयत्नात कोणीतरी तो टायर तिच्या गळ्यात टाकला असावा. नंतर मगर पकडता आली नाही. मात्र टायर गळ्यात राहिला. मॅटने मगरीला पकडण्यासाठी १६ x ५ फूट मापाचा खास पिंजराही तयार करून घेतला. पण त्याच सुमारास कोरोनामुळे हाहाकार उडाला आणि मॅटला परतावे लागले. ह्यानंतर तब्बल दोन वर्षे गेली. मगर अंगाने वाढत होती. परिस्थिती गंभीर वळण घेऊ लागली. मगर म्हणजे लहानसा सरडा नव्हे की पकडून गळ्यातील टायर काढून घ्यायचा. तब्बल १४-१५ फूट लांबीची मगर! पण म्हणतात ना, एखादी गोष्ट मनात आली तर ती करणारी निश्चयी व्यक्ती मागे राहात नाही. टिलीने (Tili) हेच केले. ३४ वर्षीय टिली हा व्यवसायाने पक्षी विक्रेता आहे. संकटात सापडलेले प्राणी सोडवणे त्याचा छंद आहे. यापूर्वी त्याने साप, मगरी यांची सुटका केली होती. तर हा टिली पालू गावी व्यवसायनिमित्ताने आला आणि त्याला मगरीबद्दल कळले. त्याने हा विडा उचलला. पैजेचा नाही, कारण तोपर्यंत संस्थेने बक्षीस रद्द केले होते. उलट त्याला पदरचे पक्षी आमिष म्हणून वापरावे लागणार होते. पकडण्यासाठी दोर वगैरेचा खर्च त्याचाच असणार होता. त्याने परिसरातील लोकांना विचारले पण तेव्हा कोणी पुढे आले नाही. मग काय? एकला चलो रे! कोंबडी आणि बदकाचे आमिष दोराला लावण्यात आले. मगरीच्या नेहमीच्या मार्गात ते ठेवण्यात आले. एक दिवस मगरीला पकडण्यात त्याला यश आले पण मगरीची ताकद अफाट असते. ती दोर तोडून पळून गेली. मग नायलॉनचे जाड दोर वापरले. ८ फेब्रुवारी२०२२ची गोष्ट. मगरीने आमिष खायला सुरुवात केली आणि टिलीने अलगद जाड दोराचा फास टाकून तिला पकडले. मगर पकडल्यावर मात्र स्थानिक मंडळी मदतीला आली. मगरीला धरून दाबून ठेवताना त्यांना घाम फुटला. मगरीचे तोंड बांधण्यात आले. मग टायरच्या खाली लाकडी ओंडका सरकवण्यात आला आणि टिलीने करवतीने टायर अक्षरशः कापून काढला. तो प्रचंड थकला. पण मगरीची सुटका झाल्याचे त्याला समाधान होते! मगरीला लगेच सोडून देण्यात आले. आता मगर नदीत मस्त विहार करत आहे.

मुलांनो, आपण फेकलेल्या वस्तू जीवघेण्या ठरतात त्या अशा! गायींच्या पोटातून ३०-४० किलो प्लॅस्टिकच्या पिशव्या निघतात. एका पक्ष्याच्या पोटातून पाण्याची अर्धा लीटरची बाटली निघाली! व्हेलसारखा प्रचंड प्राणी पॉलिस्टरची पोती घशात अडकल्यामुळे मरतो. पक्ष्यांच्या पोटात प्लॅस्टिकचे ९०-१०० बारीक तुकडे निघतात. ह्यातून आपण काही बोध घ्यायला हवा. प्लॅस्टिकचा वापर गरजे पुरताच करा. एकल-वापर (Single use) प्लॅस्टिक तर मुळीच वापरू नका. आता तर त्यावर बंदी आली आहे. पण तरीही लोक वापरताना दिसतात. प्लॅस्टिक वापरण्यावर बंधन हवे. ते फेकताना काळजीपूर्वक फेकायला हवे. जनजागृती करायला हवी. ती तुम्ही कराल याची मला खात्री आहे.

**संपर्क : ९५२७९४२४१३**



# रंगात रंगली रंगपंचमी

**मीना खोंड**

''गुड मॉर्निंग ममा !''

''व्हेरी गुड मॉर्निंग. पूजा आज रविवार असून लवकर उठली ? आता तिथे लंडनला किती वाजले.''

''सात वाजलेत. अगं आज रंगपंचमीचा कार्यक्रम आहे. आम्ही मैत्रिणी मुलांना घेऊन जाणार आहोत. अकरा वाजता कार्यक्रम आहे. आम्ही साडेदहाला निघू.''

''अरे वा ! जाऊन या. आणि आल्यावर रंगांची मजा सांगा.''

आमची सकाळची जेवण झाली. आमच्या कामात आम्ही बिझी होतो. रात्री साडेआठला पूजाचा फोन आला

''ममा आलोय गं आम्ही''

''कसा झाला कार्यक्रम पूजा ?''

''कार्यक्रम खूप छान झाला. अगं या वेळी रंगपंचमी आणि रविवार एकत्र आल्यामुळे रंगपंचमीचा आनंद

वेगळाच होता. बरेच लोक पटांगणात जाऊन रंग खेळले. इथे लंडनला सुरक्षा, स्वच्छता, सुविधा, सणांचा आनंद यांचे भान असते. त्याप्रमाणे व्यवस्थापन यथायोग्य असते.

आज रंगपंचमीच्या कार्यक्रमाचे आमंत्रण होते. आपल्याकडे रंगपंचमीच्या दिवशी लहान मुलांचा शिवशिमगा करतात हे माहिती होते.

आपल्याकडे लहान मुलांना बोलावतात. त्यांना ओवाळतात. बाळकृष्ण समजून गालाला गुलाल लावतात. त्यांना पांढरा शर्ट, गाठी, पिचकारी, रंग, पुस्तकं, खेळणं देतात.''

''आजचा कार्यक्रम काही वेगळा होता का?''

''हो! आजच्या कार्यक्रमाची विशेष उत्सुकता होती. आम्ही तिघी मैत्रिणी आमच्या मुलामुलींना घेऊन इथल्या रंगपंचमीच्या कार्यक्रमाला गेलो. दोनशेच्या जवळपास लोक होते. लहान मुलं खूप होती.''

''अरे वा छान रिस्पॉन्स मिळाला.''

''हो गं! कार्यक्रमाच्या ठिकाणी मोठ्या हॉलमध्ये दोन्ही बाजूला टेबल खुर्च्या ठेवल्या होत्या. खुर्च्यांवर स्पर्धक मुलं बसली होती. समोर रंग, ब्रश, पॅलेट आणि पांढरा टी शर्ट ठेवला होता. त्यावर मुलांनी पेंटिंग करायचे होते. मुलांच्या सर्जनशीलतेला, कल्पनेला वाव देणारी ही मुक्त स्पर्धा होती.

कुणी 'हॅपी रंगपंचमी' रंगवले. कुणी रंग खेळणारी मुले, तर कुणी रंग खेळणारे राधाकृष्ण काढले. कुणी आकाशातील रंगाप्रमाणे नुसते रंग उधळले. कुणी रंगाचे विविध अब्स्ट्रॅक्ट चितारले. मुलांनी खूप सुंदर पेंटिंग केली.''

''अरे वा! नाही तरी युरोपियन लोकांना पेंटिंगची आवड आहेच. आपण बघतो ना आर्ट गॅलरीमध्ये किती लहान लहान मुलं स्केच बुक, पेन्सिल घेऊन दिसतात. त्यांचे बाबा किंवा आई त्यांना त्या चित्राविषयी छान माहिती देतात. बरं नंतर कुठला कार्यक्रम झाला?''

''अगं ममा, आज क्रिएटिव्ह कार्यक्रम होते. कागदाच्या टोप्या तयार करण्याचा मुलांकरिता उपक्रम ठेवला होता. प्रत्येक सहभागीने छान टोपी बनवली.''

''अरे वा! फोटो काढलेस न? फोटो पाठव''

''हो हो. खूप फोटो, व्हिडिओ काढलेत.''

पुढचा कार्यक्रम होता क्वीजचा... कृष्णाच्या जीवनावरचे प्रश्न! कृष्णाला किती माता होत्या? त्याचा जन्म कुठे झाला? कृष्णाचा जन्म केव्हा झाला? राधा कृष्णाची कोण होती? कृष्णाच्या पत्नीचे नाव काय?

त्यांनी मुलांना कृष्णाच्या जीवनतील छान छान प्रसंग सांगितले. राधा कृष्णाचे नाते आध्यात्मिक (Devine) कसे होते त्याची तेथील प्रमुख पाहुण्यांनी छान माहिती दिली.

यानंतर मुलामुलींचे राधा–कृष्ण–गोपींच्या वेशातील सुंदर नृत्य झाले. मोठ्यांनी 'अरे जा रे हट नटखट ना छू रे मेरा घुंघट, पलटके दुंगी आज तुझे गाली रे', 'आज गोकुळात रंग खेळतो हरी', आणि 'वृंदावन का कृष्ण कन्हैया' ही नृत्ये केली. मजा म्हणजे 'नाटो नाटो' हा डान्स मोठ्यांनी आणि मुलांनी मिळून केला. खूप मजा आली.''

''छान गाणी निवडलीत. ही सगळी गाणी एव्हरग्रीन आहेत. ही रंगाची रंगीत गाणी मन रंगवणारी आहेत.''

''हो गं! नृत्याच्या कार्यक्रमानंतर सगळे बाहेर पटांगणात आले. टेबलवर गुलाल, कोरडे रंग ठेवले होते. आम्ही एकमेकांना गुलाल लावला. रंग लावला. मजा आली. शेवटी जेवण झाले. आम्ही सारे रंगात रंगून घरी आलो.''

मीही रंगोत्सवाची किमया ऐकता ऐकता रंगात रंगून गेले.

''पूजा खूप छान झाला तुमचा कार्यक्रम.!

लंडनमध्ये मुलांकरिता सुंदर सकारात्मक संस्कृती संवर्धनाचा कार्यक्रम आयोजित केला हे विशेष.! तू पाठवलेले फोटो बघून मीही आनंदरंगात रंगले.''

**संपर्क : ७७९९५६४२१२**

अमित डहाणे

# कुतूहल

संपर्क : ९४२१०५०३८८

'किशोर' मित्रांनो,

'किशोर' फेब्रुवारी २०२४ च्या अंकातील कुतूहलची किती उत्तरे तुम्ही बरोबर दिलीत? या अंकात दिलेल्या उत्तरांशी आपण दिलेली उत्तरे ताडून पाहा. तुमच्यासाठी आणखी काही प्रश्न दिले आहेत. स्पर्धकांनी प्रश्नांची उत्तरे कोणाचीही मदत न घेता स्वतंत्रपणे लिहून पाठवण्याचे पथ्य काटेकोरपणे पाळावे. अचूक उत्तरे 'किशोर'कडे २५ मार्च २०२४ पूर्वी अनुक्रमणिकेतील पत्रव्यवहाराच्या पत्त्यावर पाठवावीत किंवा ई-मेल करावा.

**(१) देशातील सर्वात लांब सागरी पूल 'अटल सेतू' कोठे बांधण्यात आला आहे?**

१) कोलकाता २) मुंबई
३) चेन्नई ४) अहमदाबाद

**(२) नुकत्याच निधन झालेल्या शास्त्रीय संगीतातील जेष्ठ गायिका 'डॉ. प्रभा अत्रे' या कोणत्या शास्त्रीय संगीत घराण्याच्या गायिका होत्या?**

१) किराणा घराणे २) इंदूर घराणे
३) आग्रा घराणे ४) ग्वाल्हेर घराणे

**(३) 'इंदिरा गांधी शांतता, नि:शस्त्रीकरण व विकास पुरस्कार २०२३' कोणास देण्यात आला ?**

१) डॅनियल बरेनबोइम २) अली अबू अव्वाद
३) शेख हसीना ४) पर्याय १ व २

**(४) देशातील पहिल्या केंद्रीय आदिवासी विद्यापीठाची स्थापना कोणत्या राज्यात केली जाणार आहे?**

१) झारखंड २) छत्तीसगड
३) ओरिसा ४) तेलंगणा

**(५) देशात सर्वात अधिक लांबीचे महामार्ग कोणत्या राज्यात आहेत?**

१) महाराष्ट्र २) गुजरात
३) उत्तर प्रदेश ४) मध्य प्रदेश

**(६) इथेनॉलची निर्मिती कोणत्या पिकापासून करता येते?**

१) कापूस २) सोयाबीन
३) ऊस ४) ज्वारी

**(७) हवामान बदल कामगिरी निर्देशांकात भारताचा कितवा क्रमांक आला आहे ?**

१) पहिला २) पाचवा
३) सातवा ४) दहावा

**(८) तीन हजारांहून अधिक पालकांनी त्यांच्या पाल्यांना गोष्ट सांगण्याचा 'गिनीज बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड' कोणत्या शहरात करण्यात आला?**

१) पुणे २) बंगलोर
३) दिल्ली ४) अमृतसर

**(९) आपल्या जिल्ह्यातील रक्त केंद्र आणि रक्ताची उपलब्धता याची माहिती देणारे नवीन पोर्टल कोणते आहे ?**

१) ई-रक्त सेवा २) ई - रक्त कोश
३) ई- जीवन सेवा ४) ई- रक्त पेढी

**(१०) कोणत्या राज्यात 'कार्बी आंगलोंग' या आल्याच्या जगप्रसिद्ध वाणाची सर्वाधिक लागवड केली जाते?**

१) केरळ २) पंजाब
३) कर्नाटक ४) आसाम

**(११) संपूर्णपणे प्रयोग शाळेत बनवला गेलेला पहिला तंतू कोणता आहे?**

१) रेयॉन २) पॉलिएस्टर
३) नायलॉन ४) रेशीम

**(१२) अत्तर हा शब्द कोणत्या शब्दापासून आपल्या भाषेत आला आहे ?**

१) पारशी २) उर्दू
३) कन्नड ४) हिब्रू

**(१३) मराठी भाषेतील साहित्य अकादमीचा पुरस्कार 'रिंगाण' या कादंबरीला जाहीर करण्यात आला आहे. ही कादंबरी कोणी लिहिली आहे?**

१) वीणा गवाणकर २) श्रीकांत देशमुख

३) कृष्णात खोत ४) नवनाथ गोरे

**(१४) या वर्षीचा 'भारतरत्न' हा आपल्या देशाचा सर्वोच्च नागरी सन्मान कोणास जाहीर करण्यात आला आहे?**

१) कर्पूरी ठाकूर व लालकृष्ण अडवाणी

२) कपिल देव व महेंद्रसिंग धोनी

३) आशा भोसले व शोभा गुर्टू

४) भूपेन हजारिका व प्रणव मुखर्जी

**(१५) वयाच्या ४३ व्या वर्षी ग्रँड स्लॅम जेतेपद पटकावणारा भारतीय टेनिसपटू कोण?**

१) लिअँडर पेस २) महेश भूपती

३) रोहन बोपण्णा ४) विजय अमृतराजी

* * *

## फेब्रुवारी २०२४ च्या चित्रकोड्याचे उत्तर




## कुतूहल (फेब्रुवारी २०२४) ची उत्तरे

| | |
|---|---|
| १) २ | २) १ |
| ३) ४ | ४) ४ |
| ५) १ | ६) ३ |
| ७) ३ | ८) १ |
| ९) २ | १०) ४ |
| ११) ३ | १२) १ |
| १३) ३ | १४) १ |
| १५) ३ | |

## चित्रकोडे (जानेवारी २०२४) यशस्वी स्पर्धक

**अकोला –** कु.सार्थक पिलांत्रे, कु.आर्यन फासे, कु.प्रज्वल जाधव, कु.सुरज आंबुसकर, कु.संध्या पिलांत्रे, कु.प्रगती सांगुनवेढे, कु.खुशी पिलांत्रे, कु.पियूष पुंडे

**कोल्हापूर –** कु.पल्लवी रेडेकर, कु.वृषाली तारकी

**सोलापूर –** कु.तनिष्का शितोळे, कु.प्रज्ज्वल निचळ, कु.मेघा भगरे, कु.अनोखी मोरे, कु.काव्या भोसले, कु.आनंदी बारबोले, कु.दिग्विजय गायकवाड

**नाशिक –** कु.अन्वित वुडनोर, कु.समर परदेशी

**सिंधुदुर्ग –** कु.धनश्री धुरी

**पुणे –** कु.जान्हवी आमले, कु.अद्विका दास

**सांगली –** कु.शांभवी कुलकर्णी, कु.वरद तांदळे

**रत्नागिरी –** कु.हिमाली जाधव, कु.अनुष्का सकपाळ, कु.सुमुख केतकर

**मुंबई –** कु.विवान

**परभणी –** कु.मानसी डोंगरे

**सातारा –** कु.सुवीर फडे, कु.अहरोन माने, कु.श्रेया जाधव, कु.अवंतिका घाडगे, कु.शौर्य सरगडे, कु.ध्रुव जगदाळे, कु.आर्यन जगदाळे, कु.कार्तिकी जगदाळे

**अमरावती –** कु.श्रेस्ती नळकांडे, कु.चैत्र नळकांडे

**अहमदनगर–** कु.स्वरदा गायकवाड, कु.धनश्री धुरी, कु.धनश्री तारी

**कोल्हापूर –** कु.पायल खुटाळे

**नागपूर –** कु.निरजा कुलकर्णी

**बुलढाणा –** कु.उत्कर्ष तायडे

**नांदेड –** कु.जिक्रा शेख, कु.जैद शेख

## कुतूहल जानेवारी २०२४ यशस्वी स्पर्धक

**अकोला –** कु. सुवीर फडे, कु. समर्थ टेमधरे

**कोल्हापूर –** कु. प्रांजल पाटील

माणूस जेव्हा एखादी चांगली गोष्ट करतो, तेव्हा आपण त्याला चांगला म्हणतो. अशा चांगल्या गोष्टी तुम्हीही नक्कीच केल्या असतील.

* तुम्ही दुसऱ्यांबद्दल आपुलकी आणि सहानुभूती दाखवता का?
* जे तुमच्यापेक्षा लहान आणि दुर्बल आहेत त्यांचे रक्षण करता का?
* ज्यांना मदतीची गरज आहे त्यांना मदतीचा हात देऊ करणे म्हणजे चांगुलपणा, असे तुम्हांलाही वाटते ना?

# भावी आधारस्तंभ

**मग लागा पाहू लिहायला. त्यासाठी सदर आहे – 'भावी आधारस्तंभ', तुम्हांला मानधन व वर्षभर अंक मिळेल. तुम्ही केलेल्या सत्कृत्याचा १० ते १५ ओळी मजकूर सुवाच्य अक्षरांत लिहा. तुमचे संपूर्ण नाव, पत्ता (पिनकोड नंबरसह), शाळेचे नाव, वय, इयत्ता इत्यादी तपशील द्या. पासपोर्ट आकाराचा फोटोही लावा. पाकिटावर रु.५/–चे तिकीट लावून अनुक्रमणिकेतील पत्रव्यवहाराच्या पत्त्यावर पाठवा.**



## चिरक पक्षी

एके दिवशी मी आमच्या गोठ्यात एका चिरक पक्ष्याला बघितले. तो पक्षी आमच्या गोठ्याच्या भिंतीमध्ये असलेल्या छिद्रात बसला होता. मी पक्षी गेल्यावर त्या छिद्रात डोकावून बघितले. तर तो पक्षी तिथे घरटं बनवत होता. मी खूप आनंदी झालो. त्या पक्ष्याचं थोडंसं घर बनवून झालं होतं. नंतर तिसऱ्या दिवशी त्या घरट्यात मला चार अंडी दिसली. या अंड्यांचा रंग आकाशी आणि थोडा विटकरी होता. चिरक रोज त्या अंड्यांना ऊब देऊ लागला. मी रोज त्या अंड्यांचं निरीक्षण करू लागलो. मला त्या अंड्यांना स्पर्श करण्याची खूप इच्छा होऊ लागली. पण मी त्या अंड्यांना स्पर्श केला तर पक्षी अंडे खाली ढकलून देईल हे मला माहीत होतं. म्हणून मी त्या अंड्यांना स्पर्श केला नाही.

तो पक्षी त्याच्या घरट्याच्या बाजूलाच बसायचा. जास्त करून तिथे मादी राहायची. मादीचा रंग तपकिरी रंगाचा होता. नर पक्षी थोडासा काळा होता. तो पक्षी ओरडताना, आवाज काढताना त्याचे मागचे पंख खालीवर व्हायचे. जसे की हातपंपाची दांडी जशी खालीवर होते. त्या पक्ष्याचा विणीचा हंगाम एप्रिल ते जून महिन्याचा असतो. त्याच कालावधीत आमच्या गोठ्याच्या भिंतीमध्ये घरटं केलं व अंडे घातले. मला वाटलं ती पिल्ले उडायचं शिकताना मला त्यांचं निरीक्षण करता येईल, त्यांना मला जवळून मन भरून पाहता येईल. एकदा एक चिमणी तिच्या पिल्लांना उडायचं शिकवत होती तर तिचे एक पिल्लू माझ्या हातावर आले. यामुळे मला ती पिल्ले हातावर घ्यायची खूप इच्छा होत होती.

परंतु नंतर दोन–तीन दिवसांनी मला ते पक्षी तिथे दिसलेच नाहीत. मी ते येण्याची खूप वाट बघत होतो. पण ते पक्षी कधीच घरट्याकडे आले नाहीत.याचे मला खूप दुःख झाले. माझ्या मनात वेगवेगळे विचार येऊ लागले की ते पक्षी घरट्याकडे का येत नसतील ? माझ्याकडून काही चूक झाली असेल का ? माझ्या एखाद्या मित्राने किंवा घरच्या एखाद्या लहान मुलांनी त्यांना हात लावला असेल का ? अशा अनेक प्रश्नांनी माझ्या मनात विचार चक्र निर्माण केले. परंतु मला नेमकं काय झालं आहे याचा शोध लागला नाही. जवळजवळ पंधरा–वीस दिवस झाले ते पक्षी घरट्याकडे आलेच नाही. मला वाटलं की ते पिल्ले काही दिवसांनी अंड्याच्या बाहेर येतील पण असे झाले नाही. मी आईला हे सांगितल्यावर आई म्हणाली, ''त्या अंड्यांना ऊबच नाही मिळाली तर ती अंडी आतल्या आतच खराब होऊन जातात'' हे ऐकून मला खूप वाईट वाटलं. काही दिवस झाले तरीही ते दृश्य माझ्या मनातून जात नव्हते. मी सतत तिथेच जात होतो. अशी ही खूप दुःखद घटना होती. ती माझ्या मनातच घर करून राहिली आहेत अजूनसुद्धा.

**आदर्श आसाराम गाडेकर**
वर्ग – सातवा
जि.प.प्रा.शाळा, रायपूर, ता.सेलू,
जि.परभणी – ४३१५०३



रविवारचा दिवस होता. मी माझ्या घराजवळच्या बागेत खेळत होतो. तिथे खेळताना एक छोटे बाळ हातात मोबाईल घेऊन खेळत –बागडत तिथे आले. त्या वेळी मी घसरगुंडीवर खेळत होतो नंतर ते बाळ फुलपाखरू पाहून नाचायला लागले. त्याने त्याच्या मोबाईल बाजूला ठेवला. जसजसे फुलपाखरू उडू लागले तसतसे ते बाळ त्या मागे धावू लागले.

तेवढ्यात माझ्या लक्षात आले की, तो त्याचा मोबाईल नव्हता. मी बागेतील वॉचमनकाकांना हाक मारली व त्यांना शिट्टी वाजवायला सांगितले. मी त्या बाळाच्या आईला हाक मारली. ''अहो, जोशीकाकू, तुमचा मोबाईल आहे का?'' काकूंनी तो मोबाईल घेतला व त्या आनंदित झाल्या. त्या म्हणाल्या 'बाळा नाव काय तुझे ? ''कौत्सुभ'' मी म्हणालो. काकू म्हणाल्या ''शाब्बास! त्यांनी त्या बाळाला सांगितले ''सोहम त्या दादाला टाटा कर'' त्या काकूंनी मला कॅडबरी दिली.

**कु. कौत्सुभ कुलकर्णी,**
राजस सोसायटी, बी–विंग, ५०३, टी.सी.जी. गार्डन सोसा., जवळ,
स.नं. २४/५/२४/७ बलकवडे नगर, भाग्य – ३. स्वामी गार्डन समोर, कात्रज, पुणे – ४६.



होळीचा उत्सव होता. आम्ही मैत्रिणींनी शेतात जाऊन लाकडे आणली व आम्ही शेण जमा करून शिंगोळ्या तयार केल्या व त्यामध्ये चंद्र, सूर्य पण तयार केले. संध्याकाळ झाली, आम्ही मैत्रिणींनी होळीची तयारी खूप सुंदर केली व होळीची पूजा केली. आणि बाबांच्या हातून ती पेटवली. नंतर दुसऱ्या दिवशी रंगपंचमी होती आणि आम्ही एकमेकींना रंग लावला. आमच्या एका मैत्रिणीचा वाढदिवस त्या दिवशी असल्याने तिला शुभेच्छा दिल्या.

आईबाबांना सांगून आम्ही दुपारच्या बारा वाजेपर्यंत मजा केली आणि आम्ही सर्व मैत्रिणी नदीकिनारी अंघोळ करून जवळच्या परिसरात फिरायला गेलो. फिरून झाल्यावर संध्याकाळी घरी गेलो. अशा प्रकारे खूप चांगल्या प्रकारे तो दिवस आणि मैत्रिणीचा वाढदिवस साजरा झाला.

**कु. नयना वरईकर**
इ.६ वी, जि.प.व.प्राथमिक शाळा खंडाळा, मु.खंडाळा, ता.तेल्हारा, जि.अकोला



हिवाळ्याचे दिवस होते. कडाक्याची थंडी पडली होती. शनिवार असल्याने मी व माझा मित्र हर्षल सकाळी शाळेत जात होतो. रस्त्यात आम्हाला एक कुत्र्याचे पिल्लू थंडीत कुडकुडताना दिसले. त्याला जागेवरून हलता देखील येत नव्हते. मी त्याच्या जवळ गेलो व माझ्या डब्यातील बिस्कीट त्याला खाऊ घातले. नंतर एका शेकोटीजवळ नेऊन त्याला ऊब दिली, व नंतर त्याच्या आईजवळ पोहोचवले.

शाळेत आल्यावर घडलेला प्रसंग मी मॅडमला सांगितला. माझी मुक्या प्राण्यांबद्दलची भूतदया पाहून त्यांना खूप आनंद झाला. त्यांनी परिपाठामध्ये सर्वांसमोर माझे कौतुक केले.

**कु. नेहाल दीपक पाटील**
जि. प. केंद्रीय उच्च प्राथमिक शाळा गडखांब,
मु. गडखांब, ता. अमळनेर, जि. जळगाव ४२५४०१

# उमलती प्रतिभा

## माझी शाळा

माझी शाळा आहे लहान
पण तिची कीर्ती महान
शाळेच्या भोवती हिरवे रान
तिथे उमलती फुले छान

माझी शाळा आमची आई
जगण्याचं ती बळ देई
माझ्या शाळेतील सर्व वर्ग
वाटतात जणू आनंदी स्वर्ग

माझी शाळा आहे मुलांचा मळा
सर्वांना लागलाय तिचा लळा
माझी शाळा जपते जिव्हाळा
ज्ञानाचा ती फुलवते मळा

**लावण्या सुभाष देसाई**
इयत्ता-७ वी
विद्यामंदिर एरंडपे
ता. भुदरगड, जि. कोल्हापूर-४१६२०९



**कु. अक्षदा अविनाश कुलकर्णी**
इयत्ता ७ वी, शाळा-हुजूरपागा,
पुणे - ४११०३०



**कु. रोशनी अनंता पाटील**
इयत्ता ७ वी, रा.जि.प. शाळा, खारगाव बु।।
ता. म्हसळा, जि. रायगड-४०२१०५.



**रूद्र अमित परदेशी**
जि.प.प्राथ. शाळा हट्टी, ता.चांदवड, जि. नाशिक-४२३११७

# आमची रायगड रोप-वे सहल

मी, बाबा, आई, शब्दाली दीदी सकाळी ७ वाजता पुण्यातून रायगड प्रवासाला सुरुवात केली. चांदणी चौक, पिरंगुट, पौड, मुळशी, ताम्हिणी घाट, निजामपूर, पाचाडमार्गे रायगडाच्या पायथ्याशी म्हणजे हिरकणीवाडीमध्ये पोहोचलो. रस्त्याने जाताना खूप मजा केली. निसर्गरम्य वातावरणात सूर्याचे किरण अंगावर घेत फोटो काढले. मुळशी धरणाच्या पाठीमागच्या बाजूचे पाणी अगदी ताम्हिणी घाटाच्या शेवटपर्यंत आमची साथ करत होते. एका ठिकाणी चहा नाश्ता करण्यासाठी थांबल्यावर खूप सारी माकडे आमच्याभोवती जमा झाली. सुरुवातीला मी खूप घाबरलो. पण, आईने आणि दीदीने त्या माकडांना बिस्कीट, चॉकलेट्स दिली. आणि बघता बघता आमची त्यांच्याबरोबर मैत्री झाली. ज्या जागी आम्ही थांबलो होतो त्या चहा नास्ता देणाऱ्या काकांची परिस्थिती चांगली नव्हती, थंडी होती तरी त्यांच्या अंगावर स्वेटर नव्हते, त्यांची माझ्याच वयाची मुलगी अनवाणी पायांनी सर्वांना खाण्यासाठी जे हवं ते देत होती. याचे मला वाईट वाटले ! कारण, माझ्या आईने माझ्यासाठी थंडी लागू नये म्हणून स्वेटर, कानटोपी, बूट सर्व घेतले होते.

दुपारी २ वाजता आम्ही रोपवेच्या स्टेशनला पोहोचलो. ते अगडबंब यंत्र बघून मी थक्क झालो. आमचा नंबर लागला. आम्ही सर्व एकाच बसमध्ये बसलो. बस जमिनीपासून वरवर जाताना मला खूप मजा येत होती. वर जाताना खाली असलेली सर्व गावे छान दिसत होती. जसेजसे वर जाऊ तसतसे माणसे मुंग्यासारखी दिसायला लागली, हवेमध्ये बदल जाणवायला लागला, सूर्य प्रकाशामुळे धरतीचे रूप, नद्या, डोंगर, रस्ते, झाडी, वेगळेच वाटायला लागले. म्हणजे खालून जे दिसणार नाही, ते सगळ गुगल मॅप लावल्यासारखं दिसायला लागलं. पाच मिनिटांत आम्ही वर पोहोचलो. हेच आम्ही दोन हजार पायऱ्या चालत आलो असतो तर, जास्त वेळ लागला असता. राजदरबार व नगारखान्यामधील जागेत आपल्याला ध्वनी चमत्कार अनुभवायला मिळतो. १४०० पायऱ्या चढून आल्यावर भव्य व दणकट अशा महादरवाजातून गडावर प्रवेश होतो. शत्रूपासून भक्कम संरक्षण देणारा हा दरवाजा दुर्गस्थापत्याचा अप्रतिम नमुना आहे. रायगडाच्या बांधणी विषयीचे दोन महत्त्वाचे शिलालेख जगदीश्वर वाडेश्वर मंदिराच्या आवारात आहेत. हा किल्ला भारतीय पुरातत्व सर्वेक्षण खात्याकडून राष्ट्रीय महत्त्वाची वास्तू अंतर्गत संरक्षित आहे. आम्ही गडावरील टकमक टोक बघायला गेलो. 'टकमक' हा शब्द जाणून घ्यायची माझी तीव्र इच्छा झाली. तिथे गेल्यावर गाईडने दिलेली माहिती अशी की, शिवाजी महाराजांच्या काळात जो कोणी गुन्हा करेल त्याचे हातपाय बांधून त्याला पोत्यात घालून या कड्यावरून खाली फेकायचे, त्यामुळे मुळात टकमक टोकाची शिक्षा म्हटले की, तो गुन्हेगार अर्धमेला होऊन जायचा. आणि कड्यावर आणले की तो मरणाच्या भीतीने सारखा इकडेतिकडे बघायचा आणि अशा अवस्थेत त्याला खाली फेकले जायचे, त्यामुळे टकमक टोकाची शिक्षा म्हटले की त्या काळातील लोक गुन्हा करायलाच धजावत नसे.

दुपारी १२ वाजता आम्ही खाली आलो आणि महाडच्या दिशेने प्रवास सुरू केला. डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी समता, बंधुता, न्याय हे सूत्र घेऊन अखिल मानवजातीसाठी जो संघर्ष केला होता. त्या चवदार तळ्याचे आम्ही दर्शन घेतले. दुपारचे जेवण घेऊन आम्ही वरंधा घाटाने परतीच्या प्रवासाला लागलो आणि मला अचानक आठवलं वरंधाघाट शीर्षकाचा एक धडा आम्हांला अभ्यासाला आहे. मला प्रचंड आंनद झाला. बाबांनी मला हा आनंदाचा धक्का दिला होता. धड्यामध्ये केलेले घाटाचे वर्णन आणि मी आता प्रत्यक्ष अनुभवत असलेला घाट. प्रचंड उंच आणि सह्याद्रीच्या रांगामध्ये असलेल्या घाटाचा अविस्मरणीय असा प्रसंग मी अनुभवत होतो. त्याबद्दल मी बाबा आणि आईला धन्यवाद दिले. कारण आता वर्गात मी मॅडमला सांगू शकतो, की मी प्रत्यक्ष वरंधा घाट अनुभवून आलो आहे. घाटामधील भाटघर धरणाचे पाणी आणि त्याचे विहंगम असे सौंदर्य; वा वा छान ! भोर मार्गे आम्ही पुण्यात आलो. म्हणजे आमचे सहलीचे केंद्र होते 'रायगड रोपवे!'

पण, मला काय अनुभवता आलं? मुळशी धरण, ताम्हिणी घाट, भाटघर धरण, वरंधा घाट, चवदार तळे, आणि प्रत्यक्षात रायगड..!

**कु.सक्षम शैलेश त्रिभुवन**
इयत्ता ८ वी, राघवदास विद्यालय, वारजे,
पुणे-४११०५८



कुणीतरी आहे तिथं
घनश्याम देशमुख
संपर्क : ९८२३४१३६२९
शाळेला सुट्ट्या लागल्या की, सिकंदर नेहमी मामाच्या गावात यायचा आणि चार दिवस मजेत राहायचा
मामाचा मुलगा नंदू आणि तो शेतात जाऊन धमाल करायचे. कधी कधी गावाबाहेरच्या टेकडीवरही जायचे.
नंदू, मला एकदा तरी या जंगलात भटकायला जायचं आहे. किती मज्जा येईल ना!
नको रे बाबा ! त्यापेक्षा या टेकडीवरूनच जंगल बघू या
थोडं पुढं जाऊ या ना... त्या कड्यावरून बघू.



किती घनदाट जंगल आहे हे! तू कधी खाली गेला आहेस का?
नाही, आणि कुणी तिकडे जातही नाही. वाघ अस्वल असतील तिथे...
ते बघ, त्या झाडामागे दगडी किल्ला दिसतोय...
किल्ला नाही, दगडी बंगला आहे तो! खूप जुना..इंग्रजांच्या काळातला.
त्या बंगल्याला घाबरूनच या जंगलात कुणीही फिरकत नाही. जंगलातील वनरक्षकही याला घाबरतात.
चल तर मग, बघू या तेथे आहे तरी काय?
नको नको, बाबांना कळलं ना की तू तिथं जायचं म्हणतोस.. तर ते तुला घरी पाठवतील.
नंदू, गावातल्या लोकांना आणि तुला त्या बंगल्यात भूत आहे असं वाटतं का?
नाही, माझा भुतांवर विश्वास नाही रे! पण कशाला? चल चल... घरी चल, वाट बघत असतील सगळे.
नंदू, तू उगाचच घाबरतोस, भूत नाही तर कोण आहे तिथं.
माहीत नाही.... पण कुणीतरी आहे तिथं.
क्रमशः

भारती सावंत

# फुलपाखरू

किती नाजूक हे फुलपाखरू
उडतेय कसे ते फुलांफुलांवर
रंग तयाचा सुंदर मनमोहक
पांढरे ठिपके काळ्यावर

शोषून घेई मधुरस फुलांतून
उडते भिरभिर सर्व रानभर
धावती पोरे पकडण्यासाठी
उडते पटकन फुलांपानांवर

हुंदडताना पोरे माळावरती
नाही लागत कुणाच्या हाती
मुलांच्या खेळात असते मग
चिमुकल्यांचे ते खेळसोबती

नानारंगी सुंदर नाजूकसे पंख
देवाने दिले छान रूप त्याला
लांबून पाहू कोमल जीवाला
नका देऊ त्रास त्या मुक्याला

आवडते पहाया फुलपाखरू
फुलांवर मजेत तेच उडताना
फुलांपानांआड लपून बसते
फसगत होतेय ओळखताना

संपर्क : ९६५३४४५८३५

# She...

Umashankar Devadhe

**She…**
By proving her mettle
Conquers the cliff of the Everest
Navigates the submarine into the sea
Each time you sideline her
And Triumphantly,
She rises to the occasion
**She…**
By breaking all the barriers
plays multiple roles
Justifies each part with equal zeal
And tenaciously
She encounters everything with a
strong will
**She…**
By exploring all territories
Flutters her flag very high
Crosses all boundaries
Each time you discriminate her
And vigorously
She bounces back to storm out.
**She…**
deserves to be admired
honoured and acknowledged
deserves to be encouraged
She deserves to be in the pages of
history.
**She…**

(A Tribute to all those women who multitask
to run their families)

**Contact : 9823541160**






# Save the 'BLUE'

Prachi Mokashi

Sonu wrinkled his nose as he opened a tap in the school's toilet. It was running dry. The toilet was stinking pretty badly. He closed the tap and took the last few drops of water left in his bottle to clean his hands. 'Gosh! No water to drink till I reach home…' Sonu frowned. He felt thirsty.

As he walked home, he noticed a few birds drinking from a big bowl of water kept outside a shop under a shady tree. 'Lucky birds! They must be relishing the water in this scorching heat…' As Sonu felt the sweat roll down his cheeks, he suddenly realized how precious water is!

'What if one day we have no water at all?' The thought disturbed Sonu. He recalled his mother persuading him every day to close the tap water while brushing his teeth, to stop the bucket from overflowing during bath and at times even instructing their house-help to use less water while cleaning utensils or washing clothes. She was very particular about using water judiciously as was his father. He was a farmer who knew the value of water to grow his crops. He had a sugarcane farm on the outskirts of the town that needed a lot of water.

Sonu now felt thirstier. He wanted to buy bottled water from the shop. But he finally decided to have it only after reaching home as his house wasn't far from the school.

On his way home through a basti, Sonu saw many people queued up at a common hand-pump to collect water in their buckets and utensils. This was a regular sight otherwise. But that day a few ladies who were fighting with each other to get more water caught Sonu's attention. He remembered having read the news a



few days back… 'A water parched village under drought threat…' The village was in a hilly area where wells had dried up due to drought. Women had to travel two to three kilometres daily to collect water. Even children suffered as they had to miss school to help their parents. 'Huh! War for water… Fortunately, the situation here is not that grim…' With these thoughts playing on his mind, Sonu reached home.

Sonu changed his clothes and went to the bathroom to wash his hands and feet. When he opened the tap, he was shaken.

'No water?' Sonu's heart skipped a beat. He desperately turned to ask his mother only to find her waiting outside.

"Maa, is there a water problem at home?"

"Yes, dear! I keep on telling you not to waste water. Now you see we are facing a water crisis." Maa said with a straight face.

"This isn't funny." Sonu pleaded. Maa now laughed at Sonu's fallen face. Sonu was confused.

"Our water-tank outside the house has a small leakage. Not sure since when. But as soon as we realized that it is leaking, your Baba immediately called a plumber





to fix it today itself. Maybe there will be no tap-water for the whole day. But I have filled the tank water into buckets while the tank was getting emptied by the plumber. You can use it. But make sure, you use it carefully, dear." Maa pointed to the buckets kept in the corner of the bathroom.

Sonu cleaned himself and came out. Maa gave him a glass of water that he hurriedly gulped it down. He felt satiated after a long drink.

"Maa, I had read a quote somewhere – When the well is dry, we know the worth of water. I experienced that today in school and for a moment even at home just now. The thought of having no water is so scary!"

"That is why we all must realize that if we do not want to face a water crisis in future, we need to be water 'aware' today."

"Absolutely! To keep the green, we must save the 'blue…'


**Contact : 95271 96800**

# Funny Puzzle

Ghanshyam Deshmukh

**Which baby will reach the place to taste the ice-cream?**







See the pictures and name in the vertical columns.

# चित्रकोडे

रचना - घनश्याम देशमुख

हे चित्राचे शब्दकोडे आहे. यात चित्रांची नावे लपलेली आहेत. प्रत्येक चित्र बघून खालील चित्रकोडे पूर्ण करा.




## सूचना

१) स्पर्धकांनी आपले नाव केवळ पाकिटावर न लिहिता कोडे सोडवले असेल त्या कागदावर लिहिणे आवश्यक आहे.

२) कोड्याचे उत्तर पाठवण्याची अंतिम तारीख २५ मार्च २०२४.

३) कोड्याचे उत्तर एप्रिल २०२४ च्या अंकात प्रसिद्ध होईल.

४) कोडे वेगळ्या कागदावर सोडवले तरी चालेल.

Registered R.N.I.NO. 22679/72
Kishor (Marathi) Postal Regd.No. PCW/076/2024-2026 Registered Newspapers posted at PUNE PSO, GPO- 411 001
The date of publication 26.02.2024 Posting on 27th & 28th February 2024
License to Post without prepayment of postage No. WPP-53











**कथा, कविता, कादंबरिका, एकांकिका, दीर्घकथा, गंमतगाणी, ललित, छंद, चरित्र, विज्ञान, देश-देशांतर, लोककथा**

लोकप्रिय व अभिरुचिसंपन्न किशोर मासिकातील चाळीस वर्षांतील निवडक साहित्यांवर आधारित ‘निवडक किशोर’चे १४ खंड









किंमत प्रत्येकी
₹ १६३ /-
(५०% सूट)






**वरील खंड पाठ्यपुस्तक मंडळाच्या सर्व भांडारांत विक्रीसाठी उपलब्ध आहेत. १४ खंडांची एकूण किंमत ₹ ११४१/-**

किशोर

**If not delivered please return to :**
संपादक, ‘किशोर’ मासिक
महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व
अभ्यासक्रम संशोधन मंडळ,
‘बालभारती’, सेनापती बापट मार्ग,
पुणे – ४११ ००४.
दूरध्वनी : ०२० – २५७१६२४४
ई–मेल : executive_editor_kishor@ebalbharati.in
वेबसाईट : www.kishor.ebalbharati.in

प्रति,